पवित्र श्रावण मासारंभानिमित्त मंगलमय शुभेच्छा !
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवास अनेक, शाबुदाणा मात्र फक्त कॅमलचाच
1 kg | 500gm | 250gm
सर्व किराणा दुकानांमध्ये उपलब्ध

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
9601222777
9615222777
काळे ज्वेलर्स
सोने चांदी हिरे नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २०१ । किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) बुधवार १९/०८/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेंद्रमध्ये बांधा !
मेन रोड, संगमनेर, फोन : ०२४२५ - २२५७४०, ७९०१०३११५५
१९५९ पासून विश्वासाची सार्थ परंपरा... राजेंद्र

## अवैध वाळू वाहतुकीवर एलसीबीचा दणका; ५ लाखांचा मुद्देमाल जप्त



युवावार्ता (प्रतिनिधी)

घारगाव - पठार भागात राजरोसपणे सुरू असलेल्या अवैध वाळू वाहतुकीविरोधात अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) धडक कारवाई केली. मांडवे बुद्रुक शिवारात सापळा रचून अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या टेम्पोसह एकाला पोलिसांनी ताब्यात घेतले. या कारवाईत तब्बल ५ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे अवैध वाळू वाहतूकदारांचे धाबे दणाणले आहेत.

अहिल्यानगर जिल्ह्यात अवैध वाळू उपसा व वाहतुकीला आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विकास जाधव, पोलीस अंमलदार गणेश लोंढे, योगेश कर्डीले, बाळासाहेब गुंजाळ आणि रोहित येमुल यांचे पथक संगमनेर तालुक्यातील घारगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांची माहिती घेण्यासाठी रवाना झाले होते. सोमवारी (१८ ऑगस्ट) पथक गस्त घालत असताना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मंगेश शेंडगे हा अशोक लेलंड कंपनीच्या टेम्पोमधून मांडवे येथून साकूरच्या दिशेने अवैध वाळूची वाहतूक करीत आहे. या माहितीची खातरजमा करून पोलिसांनी पंचांसमक्ष मांडवे बुद्रुक शिवारातील हॉटेल श्रीनाथजवळ सापळा रचला.

काही वेळातच संशयित टेम्पो तेथे येताच पोलिसांनी तो अडवून तपासणी केली. तपासणीदरम्यान टेम्पोमध्ये अवैधरीत्या वाहतूक करण्यात येत असलेली वाळू आढळून आली. पोलिसांनी तत्काळ टेम्पो चालक मंगेश धोंडीभाऊ शेंडगे (वय ३५, रा. मांडवे बुद्रुक, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) याला ताब्यात घेतले. या कारवाईत ५ लाख रुपये किमतीचा विनाक्रमांकाचा अशोक लेलंड 'बडा दोस्त' टेम्पो आणि ८ हजार रुपये किमतीची वाळू, असा एकूण ५ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी आरोपीविरुद्ध घारगाव पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## डॉ. दाभोलकर हत्या प्रकरणाला नवे वळण

### सचिन अंदुरेला जामीन, जन्मठेपेच्या शिक्षेलाही स्थगिती



मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्या प्रकरणाला तब्बल १३ वर्षांनंतर पुन्हा एकदा महत्त्वाचे वळण मिळाले आहे. पुणे सत्र न्यायालयाने दोषी ठरवलेल्या सचिन अंदुरे याला मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी (१८ ऑगस्ट) मोठा दिलासा देत जामीन मंजूर केला. तसेच त्याला सुनावण्यात आलेल्या जन्मठेपेच्या शिक्षेलाही स्थगिती दिली आहे. न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती रणजितसिंह भोसले यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला.

या निर्णयामुळे २०२४ मध्ये दोषी ठरलेल्या दाभोलकर हत्या प्रकरणातील सचिन अंदुरे आणि शरद कळसकर या दोन्ही आरोपींना सध्या जामिनावर बाहेर येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यापूर्वी एप्रिल २०२६ मध्ये उच्च न्यायालयाने शरद कळसकर यालाही जामीन मंजूर करत त्याच्या जन्मठेपेच्या शिक्षेला स्थगिती दिली होती.डॉ. नरेंद्र दाभोलकर हे अंधश्रद्धा, अघोरी प्रथा आणि बुवाबाजीविरोधात सातत्याने जनजागृती करणारे सामाजिक कार्यकर्ते होते. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून त्यांनी राज्यात अंधश्रद्धाविरोधी चळवळीला व्यापक स्वरूप दिले. २० ऑगस्ट २०१३ रोजी पुण्यातील ओंकारेश्वर पुलाजवळ सकाळच्या सुमारास दुचाकीवरून आलेल्या हल्लेखोरांनी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. या हल्ल्यात दाभोलकर यांचा मृत्यू झाला. या घटनेने महाराष्ट्रासह संपूर्ण देशात मोठी खळबळ उडाली होती.

हत्येचा प्रारंभीचा तपास पुणे पोलिसांकडे होता. मात्र तपासाच्या प्रगतीबाबत प्रश्न उपस्थित झाल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाने २०१४ मध्ये हा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) सोपवण्यात आला. त्यानंतर सीबीआयने हत्येचा कट, आरोपी आणि प्रत्यक्ष हल्लेखोरांचा शोध घेण्यास सुरुवात केली. तपासादरम्यान सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांच्यावर दाभोलकर यांच्या हत्येत प्रत्यक्ष सहभागाचा आरोप ठेवण्यात आला. सीबीआयने दोघांची हत्येतील भूमिका असल्याचा दावा न्यायालयात केला होता. पुणे येथील विशेष न्यायालयाने १० मे २०२४ रोजी सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांना दाभोलकर हत्या प्रकरणात दोषी ठरवले. दोघांनाही जन्मठेपेची शिक्षा आणि प्रत्येकी पाच लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. याच प्रकरणात सीबीआयने कथित सूत्रधार म्हणून डॉ. वीरेंद्रसिंह तावडे यांचे नाव पुढे केले होते. मात्र पुराव्याअभावी न्यायालयाने तावडे यांच्यासह संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे यांची निर्दोष मुक्तता केली. त्यामुळे दाभोलकर यांच्या हत्येमागील व्यापक कट आणि त्यामागील कथित सूत्रधाराचा प्रश्न अद्याप चर्चेत आहे.

एप्रिल २०२६ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने शरद कळसकरला जामीन मंजूर केला होता. त्याच्या ओळखीबाबत आणि तोच प्रत्यक्ष हल्लेखोर असल्याच्या दाव्याबाबत न्यायालयाने प्रथमदर्शनी काही शंका उपस्थित केल्या होत्या. त्याची जन्मठेपही स्थगित करण्यात आली होती.

## कत्तलीच्या उद्देशाने डांबून ठेवलेल्या ११ गोवंशीय जनावरांची सुटका

### रहेमतनगर परिसरात कारवाई; १ लाख ७० हजारांचा मुद्देमाल जप्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरातील रहेमतनगर परिसरातील आर. के. प्लॉटींगजवळील काटवनात कत्तलीच्या उद्देशाने बेकायदेशीरपणे डांबून ठेवलेल्या ११ गोवंशीय जनावरांची अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने सुटका केली. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे गोवंशाची अवैध वाहतूक व कत्तलीसाठी होणाऱ्या तस्करीविरोधात मोठी कारवाई झाली आहे. या कारवाईत एकूण १ लाख ७० हजार रुपये किमतीची ११ जनावरे ताब्यात घेण्यात आली



असून, याप्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्ह्यात गोवंशीय जनावरांची अवैध वाहतूक, कत्तल तसेच त्यासाठी होणाऱ्या बेकायदेशीर साठवणुकीविरोधात कठोर कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या आहेत. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करून कारवाईसाठी रवाना करण्यात आले होते.

सोमवारी (१७ ऑगस्ट) स्थानिक गुन्हे शाखेचे पथक संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांबाबत माहिती घेत असताना रहेमतनगर परिसरातील आर. के. प्लॉटींगच्या बाजूला असलेल्या काटवनात काही गोवंशीय जनावरे अत्यंत दयनीय परिस्थितीत बांधून ठेवल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली.

या माहितीची खातरजमा करून पोलिसांनी पंचासमक्ष संबंधित ठिकाणी अचानक छापा टाकला. त्यावेळी काटवनात लहान-मोठी अशी ११ गोवंशीय जनावरे कोणत्याही चारा-पाण्याची व्यवस्था न करता डांबून ठेवलेली आढळून आली. परिस्थिती पाहता ही जनावरे कत्तलीच्या उद्देशाने बेकायदेशीरपणे ठेवण्यात आल्याचा पोलिसांचा संशय आहे.

पोलिसांनी तातडीने सर्व ११ जनावरांना ताब्यात घेतले. घटनास्थळाच्या परिसरात तसेच आसपास राहणाऱ्या नागरिकांकडे जनावरांच्या मालकाबाबत चौकशी करण्यात आली. मात्र, जनावरांचा मालक किंवा त्यांना तेथे आणून डांबून ठेवणाऱ्याबाबत कोणतीही ठोस माहिती मिळू शकली नाही.

या कारवाईत ताब्यात घेण्यात आलेल्या ११ गोवंशीय जनावरांची एकूण किंमत १ लाख ७० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. जनावरांची सुटका करून त्यांना सुरक्षित ठिकाणी हलविण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

(पान २ वर)

## औद्योगिक वसाहतीच्या जागेवर सौर प्रकल्पाला विरोध

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर -

पठार भागातील हजारो युवकांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी कौठेमलकापूर येथे शेकडो हेक्टर क्षेत्रावर औद्योगिक वसाहत उभारण्याचा प्रकल्प मंजूर झाला आहे. मात्र, औद्योगिक वसाहतीसाठी प्रस्तावित व एमआयडीसीच्या ताब्यातील जागेवर मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्पाचे काम सुरू झाल्याने स्थानिक पातळीवर विरोध सुरू झाला आहे.

सौर प्रकल्पामुळे भविष्यात औद्योगिक वसाहतीच्या प्रकल्पावर परिणाम होऊन युवकांच्या रोजगाराच्या संधी धोक्यात येतील, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे. याची माहिती मिळताच भाजप तालुकाध्यक्ष गुलाबराजे भोसले, सरपंच रविंद्र दातीर, भाजप उपाध्यक्ष गणेश डोंगरे यांच्यासह महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन कामाची पाहणी केली. औद्योगिक वसाहतीसाठी प्रस्तावित जागेवर सौर प्रकल्पाचे काम सुरू ठेवू नये अशी भूमिका घेत पदाधिकाऱ्यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना काम थांबविण्याची सूचना केली. त्यानंतर सौर प्रकल्पाचे काम बंद करण्यात आले. सौर प्रकल्पाचे काम पुन्हा सुरू झाल्यास १९ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता तीव्र आंदोलन करण्याचा इशारा महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

ADVANCE GOLD SIP SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
ओममयूर ज्वेलर्स
OM MAYUR JEWELLERS
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
आला रे आला राजपाल सेल आला..!
30 ते 70% डिस्काउंट सेल
खरेदीवर आकर्षक गिफ्ट
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
श्रावण मास आणि रक्षाबंधन निमित्त
चांदी खरेदी वर 30% डिस्काउंट
ऑफर फक्त 31 ऑगस्ट पर्यंत
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

# शिवसेनेच्या दणक्यानंतर नगरपालिका प्रशासनाला जाग

## शहरातील CCTV यंत्रणा होणार अधिक सक्षम



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बंद अवस्थेत असलेले सीसीटिव्ही कॅमेरे तातडीने सुरू करावेत तसेच शहरातील संवेदनशील व महत्त्वाच्या ठिकाणी नवीन सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत, अशी मागणी संगमनेरचे आमदार अमोल खताळ पाटील यांच्या नेतृत्वाखाली युवासेना शहर अध्यक्ष सार्थक शेवाळे यांनी संगमनेर नगरपरिषदेकडे निवेदनाद्वारे केली होती.

शहरातील अनेक ठिकाणी बसविण्यात आलेले सीसीटिव्ही कॅमेरे बंद असल्याने चोरी, घरफोडी, अपघात तसेच विविध गुन्ह्यांच्या तपासामध्ये अडचणी निर्माण होत होत्या. या पार्श्वभूमीवर शहरातील प्रमुख चौक, शाळा -महाविद्यालय परिसर, मुख्य बाजारपेठ तसेच सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील ठिकाणी सीसीटिव्ही यंत्रणा सक्षम करण्याची ठोस मागणी युवासेनेच्या वतीने करण्यात आली होती.

युवासेनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर अखेर नगरपालिका प्रशासनाला जाग आली असून, शहरात सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. त्यामुळे शहरातील सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत होण्यास मदत होणार आहे. गुन्हेगारी घटनांवर नियंत्रण ठेवण्यासह संशयितांचा शोध घेण्यासाठीही पोलिस प्रशासनाला या यंत्रणेचा मोठा फायदा होणार आहे. युवासेनेने उपस्थित केलेल्या नागरिकांच्या सुरक्षेशी संबंधित महत्त्वाच्या प्रश्नावर प्रत्यक्ष कार्यवाही सुरू झाल्याने शहरातील नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

संगमनेर शहरातील नागरिकांची सुरक्षितता हा आमच्यासाठी प्राधान्याचा विषय आहे. नागरिकांच्या हिताच्या प्रश्नांसाठी आमदार अमोल खताळ पाटील यांच्या नेतृत्वाखाली आम्ही सातत्याने आवाज उठवत राहू आणि प्रश्न मार्गी लागेपर्यंत पाठपुरावा करत राहू, अशी प्रतिक्रिया युवासेना शहर अध्यक्ष सार्थक शेवाळे यांनी दिली. शहरातील बंद सीसीटीव्ही कॅमेरे लवकरात लवकर कार्यान्वित करून आवश्यक व संवेदनशील ठिकाणी नवीन कॅमेरे बसविण्याची संपूर्ण प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यात यावी, अशी अपेक्षाही युवासेनेच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार मिळावा - विश्वास पाटील



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत महत्त्वाचे योगदान देणारे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी मराठी साहित्याला नवी दिशा दिली. त्यांच्या साहित्याचा विविध भाषांमध्ये अनुवाद झाला असून, त्यांनी महानगरीय साहित्याचा पाया घातला. अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न द्यावे, अशी आग्रही मागणी अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष तथा पानिपतकार विश्वास पाटील यांनी केली.

मालपाणी लॉन्स येथे सत्यशोधक साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रबोधन मंचाच्या वतीने आयोजित १०६व्या जयंतीनिमित्त गुणगौरव सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी आमदार सत्यजित तांबे, काँग्रेस अनुसूचित जाती-जमाती विभागाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. अनिरुद्ध वनकर, डॉ. जयश्रीताई थोरात यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते. विश्वास पाटील म्हणाले, अण्णाभाऊंचे जीवन अत्यंत संघर्षमय होते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील अग्रणी व्यक्तींमध्ये त्यांचे नाव घेतले जाते. समानता आणि मानवतावादाचा पुरस्कार करणाऱ्या अण्णाभाऊंच्या 'फकिरा' आणि 'माकडीचा माळ' या कादंबऱ्या साहित्यविश्वासाठी अजिंठा-वेरूळसारख्या आहेत. त्यांच्या साहित्यामधून तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे वास्तव आणि गांभीर्य प्रभावीपणे समोर येते. विविध भाषांमध्ये त्यांचे साहित्य पोहोचले असून, त्यांच्या कार्याचा सन्मान म्हणून केंद्र सरकारने त्यांना भारतरत्न द्यावे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी मातंग समाजातील पहिली आयएएस अधिकारी प्रेरणा खवळे यांचा सन्मान करण्यात आला. प्रा. रघुनाथ खरात यांना जीवनगौरव पुरस्कार, तर डॉ. साहेबराव गायकवाड, डॉ. भाऊसाहेब पवार, प्रा. तुकाराम सोळशे, प्राचार्य काळूराम बोरुडे, मिराबाई आव्हाड आणि प्राचार्य चंद्रकांत चव्हाण यांना समाजभूषण पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.● डॉ. अनिरुद्ध वनकर म्हणाले, अण्णाभाऊंचा विचार हा मानवतेचा विचार आहे. त्यांना एका जातीपुरते मर्यादित ठेवणे योग्य नाही. महापुरुषांच्या जयंती केवळ उत्सवापुरत्या मर्यादित न ठेवता त्यांच्या विचारांचा स्वीकार केला पाहिजे.

आमदार सत्यजित तांबे यांनी संगमनेर शहरात अण्णाभाऊ साठे यांचे अद्ययावत स्मारक उभारण्यात येणार असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी महापुरुषांकडून प्रेरणा घेऊन मोठी ध्येये ठेवावीत आणि सॅल्यूट घेणारे होण्याची जिद्द ठेवावी, असे आवाहन त्यांनी केले.

# स्वातंत्र्यदिनानिमित्त दंडे गोल्ड अँड डायमंड्सतर्फे सैनिक व माजी सैनिकांचा सन्मान



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - १९२७ पासून सराफी व्यवसायात कार्यरत असलेल्या दंडे गोल्ड अँड डायमंड्स या विश्वासार्ह सराफी पेढीच्या नाशिक रोड, सिन्नर आणि संगमनेर येथे शाखा आहेत. ग्राहकांचा विश्वास, दर्जेदार दागिने आणि चांगली सेवा या माध्यमातून दंडे गोल्ड अँड डायमंड्सने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबविणाऱ्या दंडे गोल्ड अँड डायमंड्स, संगमनेर शाखेतर्फे १५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त सैनिक व माजी सैनिकांचा विशेष सन्मान करण्यात आला.

देशाच्या रक्षणासाठी आपले आयुष्य समर्पित करणाऱ्या सैनिक आणि माजी सैनिकांप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संगमनेर तालुक्यातील सैनिक व माजी सैनिक तसेच त्यांच्या कुटुंबीयांना विशेष आमंत्रित करण्यात आले होते.

या प्रसंगी सोमनाथ गांधोळे, धनंजय वाकचौरे, गोविंद खराडे, अर्जुन शंकर सानप, मंगल कैलास उगले, लक्ष्मण ढोले, रामनाथ ढोले, राजेंद्र ताजणे आणि समीर म्हटाळे यांचा सन्मान करण्यात आला. उपस्थित सैनिक व माजी सैनिकांना सन्मानपत्र देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच दंडे गोल्ड अँड डायमंड्सच्या सराफी परंपरेचे प्रतीक म्हणून पूर्वीच्या काळात सोने तपासण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कसोटीची प्रतिकृती असलेले स्मृतिचिन्ह (कसोटी) त्यांना देण्यात आले.

यावेळी उपस्थित सैनिक व माजी सैनिकांनी आपल्या देशसेवेतील अनुभव आणि मनोगत व्यक्त केले. त्यांच्या मनोगतातून देशासाठी केलेली सेवा, त्याग, शिस्त आणि कर्तव्यनिष्ठा यांची माहिती उपस्थितांना मिळाली. त्यांचे अनुभव उपस्थितांसाठी तसेच तरुण पिढीसाठी प्रेरणादायी ठरले.

याप्रसंगी दंडे गोल्ड अँड डायमंड्स, संगमनेर शाखेचे व्यवस्थापक श्री. सुनील वानखेडे व सौ. कोमल सूर्यवंशी यांच्या हस्ते सैनिक व माजी सैनिकांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलताना श्री. सुनील वानखेडे म्हणाले, सैनिकांचा सन्मान करणे हा आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. देशाच्या रक्षणासाठी त्यांनी केलेल्या त्याग आणि सेवेसाठी त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा आमचा छोटासा प्रयत्न आहे.

दंडे गोल्ड अँड डायमंड्स परिवारातर्फे देशासाठी सेवा देणाऱ्या सर्व सैनिक आणि माजी सैनिकांना मनःपूर्वक सलाम करण्यात आला. त्यांचा सन्मान करणे ही आमच्यासाठी केवळ एक औपचारिकता नसून, देशसेवेप्रती आदर व्यक्त करण्याची संधी आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# अहिल्यादेवी बारव प्रकरणी स्वतंत्र चौकशीची मागणी

## ग्रामसभेतील निर्णयप्रक्रियेवर सामाजिक कार्यकर्ते योगेश शिंदे यांचे गंभीर प्रश्न

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ग्रामसभेत मांडण्यात आलेल्या अहिल्यादेवी बारवाच्या पुनरुज्जीवनाच्या मागणीला नकार देताना ग्रामपंचायतीने केलेल्या निर्णयप्रक्रियेची स्वतंत्र व वरिष्ठ प्राधिकरणामार्फत चौकशी करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते योगेश शिंदे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

ग्रामसभा ही स्थानिक स्वराज्य व्यवस्थेतील नागरिकांच्या थेट सहभागाची वैधानिक व्यवस्था असल्याने ग्रामसभेत मांडलेल्या सार्वजनिक विषयाला नकार देताना निर्णयाचे कारण स्पष्ट, पुराव्यावर आधारित आणि कायदेशीर तरतुदींशी सुसंगत असणे आवश्यक आहे. मात्र, ऐतिहासिक वास्तूच्या पुनरुज्जीवनाच्या मागणीला कोणत्याही तांत्रिक अथवा पुरातत्त्वीय मूल्यांकनाशिवाय 'व्यापक लोकहिताचा विषय नाही', तसेच तो 'जात-जातीत व धर्मात तेढ निर्माण करणारा' आणि 'शासकीय धोरणाविरुद्ध' असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला असल्यास त्यामागील आधार तपासणे आवश्यक असल्याचे शिंदे यांनी निवेदनात म्हटले आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित निष्कर्ष काढण्यासाठी कोणता अहवाल किंवा पुरावा उपलब्ध आहे, याची पडताळणी करावी. 'शासकीय धोरणाविरुद्ध'



**सामाजिक कार्यकर्ते योगेश शिंदे यांनी खासदार निलेश लंके यांच्या सोबत केंद्रीय वनमंत्री भूपेंद्र यादव यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी अर्जुन घोडे, दिपक पाळंदे, शुभम कर्णर आदि उपस्थित होते.**

असल्याचे नमूद केले असल्यास संबंधित शासन निर्णय, परिपत्रक अथवा कायदेशीर तरतुदीची प्रमाणित प्रत मागवावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच, 'व्यापक लोकहिताचा विषय नाही' हा निष्कर्ष काढण्यापूर्वी ग्रामपंचायतीने स्थळ पाहणी, महसूल अभिलेखांची तपासणी, ऐतिहासिक संदर्भांची पडताळणी किंवा तांत्रिक/पुरातत्त्वीय तपासणी केली होती का, याचीही चौकशी करावी, असे निवेदनात नमूद आहे.

४ सप्टेंबर २०२५ रोजीच्या ग्रामसभेची कागदपत्रे तपासण्याची मागणी- दिनांक ४ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या ग्रामसभेचा अजेंडा, उपस्थिती पत्रक, इतिवृत्त, ठराव क्रमांक १४/३ तसेच त्यानंतर झालेली संपूर्ण निर्णयप्रक्रिया तपासण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय अहिल्यादेवी बारवाची स्वतंत्र पुरातत्त्वीय, ऐतिहासिक व संरचनात्मक पाहणी करून त्याच्या वारसा मूल्याबाबत अधिकृत अहवाल तयार करण्याचे निर्देश द्यावेत, असेही निवेदनात म्हटले आहे.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील कलम १५३ अन्वये स्वतंत्र प्रशासकीय चौकशी करण्यासाठी सक्षम वरिष्ठ अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. चौकशीत सरपंच, उपसरपंच, सदस्य किंवा संबंधित अधिकाऱ्यांकडून कर्तव्यच्युती, गैरवर्तन अथवा वैधानिक कर्तव्याची उपेक्षा आढळल्यास कलम ३९ व ३९-अ अंतर्गत लागू कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी शिंदे यांनी केली आहे.

## पान १ वरून -

# कत्तलीच्या उद्देशाने ....

याप्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ७८९/२०२६ अन्वये महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम, १९९५ (सुधारित २०१५) मधील कलम ५ (अ), ५ (ब), ९ तसेच प्राण्यांना निर्दयतेने वागवण्यास प्रतिबंध करणाऱ्या कायद्यातील कलम ३ व ११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मालकाचा शोध सुरू

दरम्यान, ही जनावरे नेमकी कोणाची आहेत, त्यांना काटवनात कोणी आणून डांबून ठेवले आणि त्यामागे कत्तलीसाठी होणाऱ्या अवैध वाहतुकीचे जाळे आहे का, याचा तपास संगमनेर शहर पोलीस करीत आहेत. संबंधित जनावरांच्या मालकाचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपासाची चक्रे गतिमान करण्यात आली आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन व पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या सूचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक विकास जाधव, पोलीस अंमलदार गणेश लोंढे, योगेश कर्डीले, बाळासाहेब गुंजाळ आणि रोहित येमुल यांच्या पथकाने केली.

SUBSCRIBE DAINIKYUVAVARTA YOUTUBE CHANNEL

# कळमजाई परिसर पर्यटकांचे आकर्षण केंद्र ठरेल- माजी मंत्री थोरात



**आ. सत्यजित तांबे प्रयत्नातून २५ लाख रुपयांचा निधी**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेर तालुक्याला निसर्गाचे मोठे वरदान लाभले असून गर्द हिरवाईने नटलेले डोंगर, पावसाची रिमझिम आणि अशा रमणीय वातावरणात अत्यंत मोठ्या उत्साहाने आणि आनंदान महिला भगिनींनी लेझीम पथकात लोकनेते बाळासाहेब थोरात व आमदार सत्यजित तांबे यांचे केलेले स्वागत हे संस्मरणीय ठरले असून हा परिसर पर्यटकांसाठी मोठे आकर्षणाचे केंद्र ठरेल असा विश्वास महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केला आहे.

कोठे बुद्रुक व खांडगेदरा परिसरात असलेल्या कळमजाई मंदिरासाठी आमदार सत्यजित तांबे यांच्या प्रयत्नातून सुसोबी करण्यासाठी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या अंतर्गत होणाऱ्या विविध कामांच्या शुभारंभ करण्यात आला यावेळी लोकनेते बाळासाहेब थोरात, आमदार सत्यजित तांबे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अजय फटांगरे, युवा काँग्रेसचे उपाध्यक्ष अक्षय ढोकरे, शांताराम ढोकरे, दत्तात्रेय खांडगे, राजू ढोकरे, बबलू खांडगे, पोलीस पाटील दत्तू खांडगे, सुभाष ढोकरे, माधव ढोकरे ,प्रकाश खांडगे, संजय खांडगे, ओंकार ढोकरे, जालिंदर ढोकरे, सुधीर खांडगे, यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

आमदार सत्यजित तांबे यांच्या प्रयत्नातून कळमजाई मंदिर परिसराच्या सुशोभीकरणासाठी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असून या अंतर्गत सभामंडप, विद्युतीकरण, रस्ता, पेविंग ब्लॉक यांच्यासह विविध सुशोभीकरणाची कामे होणार आहेत.

यावेळी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की संगमनेर तालुका हा विस्ताराने मोठा आहे तालुक्यात १७१ गावे आणि २५८ वाड्यावर असते असून आपण सातत्याने प्रत्येक गावामध्ये विकासाच्या योजना राबवल्या आहेत. शांतता सुव्यवस्था आणि भक्कम अर्थव्यवस्थेबरोबर बंधू भावाचे वातावरण असलेला हा तालुका राज्यांमध्ये अग्रगण्य आहे. कळमजाई परिसर हा निसर्गाच्या सानिध्यात असून येथील धबधबा पाहण्यासाठी पावसाळ्यामध्ये पर्यटकांची मोठी गर्दी असते. नव्याने होत असलेल्या सुशोभीकरणामुळे हे पर्यटकांसाठी आकर्षण ठरेल असे ते म्हणाले.

तर आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, संगमनेर तालुका हा निसर्गाने समृद्ध तालुका आहे लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वात बाळेश्वर, निझरनेश्वर, रामेश्वर, अकलापूरचे दत्त देवस्थान, खंडेश्वर या विविध तीर्थक्षेत्रांचा मोठा विकास झाला आहे. कळमजाई हा परिसर भाविकांसाठी आणि पर्यटकांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे निसर्गाचे भरपूर वरदान या ठिकाणी असून येणाऱ्या पाच वर्षांमध्ये अमुलाग्र बदल या परिसरात झालेल्या दिसेल असे ते म्हणाले.


महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता

कुकडी वितरण बांधकाम विभाग, कोळवडी,ता. कर्जत जि. अहिल्यानगर, पिन कोड -४१४४०२

ई मेल पत्ता – kdcdkolwadi.engineer83@.com

ई– निविदा सुचना क्र. ०४ सन २०२६–२७

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, कुकडी वितरण बांधकाम विभाग, कोळवडो ता. कर्जत जि. अहिल्यानगर, पिन कोड ४१४४०२ जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई–निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, कुकडी वितरण बांधकाम विभाग, कोळवडी ता. कर्जत जि. अहिल्यानगर, यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | जिल्हा | निविदेची किंमत रूपये | ठेकेदार पात्रता |
|---|---|---|---|---|
| १) | को.प. बंधारा करमनवाडी, ता. कर्जतची दुरूस्ती करणे | अहिल्यानगर | ३९,२५,६२०/– | सार्वजनिक बांधकाम नोंदणीकृत वर्ग ५ अ व त्यापुढील |
| २) | को.प. बंधारा पिंपरखेड, ता. जामखेडची दुरूस्ती करणे | अहिल्यानगर | ९,३०,१४२/– | सार्वजनिक बांधकाम नोंदणीकृत वर्ग ५ अ व त्यापुढील |

निविदा उपलब्ध कालावधी – दिनांक –१८/०८/२०२६ ते दिनांक २५/०८/२०२६

निविदा उघडण्याचा दिनांक – २७/०८/२०२६

जा. क्र. कुविबांवि/लेशा-२/३०८७/सन-२०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
कुकडी वितरण बांधकाम विभाग, कोळवडी
दिनांक -१४/०८/२०२६

कार्यकारी अभियंता
कुकडी वितरण बांधकाम विभाग
कोळवाडी, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर

जिमाका/नगर/ जाहि/८८/२०२६

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# रोटरी क्लब ऑफ संगमनेरला डिस्ट्रिक्ट ३१३२ चे ९ मानाचे पुरस्कार



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- रोटरी क्लब ऑफ संगमनेरच्या रोटरी वर्ष २०२५-२६ मधील उल्लेखनीय सामाजिक व सेवाभावी कार्याची दखल घेत रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ आयोजित - chiever Awards २०२५-२६ सोहळ्यात क्लबला तब्बल ९ मानाचे पुरस्कार प्राप्त झाले. या पुरस्कारांमध्ये क्लबचे प्रशासन, नेतृत्व, रोटरी फाउंडेशनमधील योगदान, सभासद विकास तसेच संपूर्ण वर्षभरातील सेवाकार्याचा गौरव करण्यात आला. या सोहळ्यात डिस्ट्रिक्ट ३१३२ चे प्रांतपाल रो. जयेशभाई पटेल, फर्स्ट लेडी रो. पारुलभाभी पटेल, माजी प्रांतपाल रो. सुधीरजी लातुरे, सौ. संगीता लातुरे, रो क्षितिज व मधुरा झावरे, रो. सतीश व सरिता लोणीकर, तसेच सर्व माजी प्रांतपाल, सर्व उपप्रांतपाल, सर्व डिस्ट्रिक्ट डायरेक्टर व डिस्ट्रिक्ट ३१३२ मधील १०४ क्लब मधील सर्व मान्यवर रोटरिअन उपस्थित होते.

क्लबचे अध्यक्ष रो. विश्वनाथ मालाणी यांना Outstanding President of the Year Trophy हा विशेष सन्मान प्राप्त झाला. त्यांच्या सकारात्मक, सर्वसमावेशक आणि सेवाभावी नेतृत्वाखाली क्लबने आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, दिव्यांग सेवा, सामाजिक विकास आणि फेलोशिप अशा विविध क्षेत्रांत अनेक प्रभावी प्रकल्प राबविले.

या वर्षी क्लबला मिळालेले पुरस्कार पुढीलप्रमाणे आहेत-

बेस्ट मॅनेज ट्रस्ट, प्रथम क्रमांक, आउटस्टँडिंग प्रेसिडेंट ट्रॉफी, हायस्ट कॉंट्रीब्युशन ट्रॉफी, मेंबरशिप ब्रॉन्झ ट्रॉफी, स्पेशल क्लब ऍप्रिसिएशन ट्रॉफी, डिस्ट्रिक्ट गव्हर्नर सिटेशन ट्रॉफी आणि रोटरी इंटरनॅशनल सिटेशन ट्रॉफी. याशिवाय डिस्ट्रिक्ट डायरेक्टर रो. दिलीप मालपाणी आणि रो. अजित काकडे यांना त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल स्वतंत्र स्पेसिअल अँपरेसिएशन ट्रॉफी प्रदान करण्यात आली.

नेत्रसेवेत उल्लेखनीय कार्य- क्लबच्या सेवाकार्यात दर्शन रोटरी आय केअर हॉस्पिटल हे प्रमुख केंद्र राहिले. वर्षभरात ९८ नेत्रतपासणी शिबिरांमधून ६,५१९ नागरिकांची तपासणी, तर रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभागात १३,१३७ रुग्णांवर उपचार करण्यात आले. १,३८५ मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून त्यापैकी ४५५ शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करण्यात आल्या. ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत नेत्रसेवा पोहोचविण्यासाठी मोबाईल आय चेकप व्हॅन च्या माध्यमातून विविध गावांमध्ये शिबिरे घेण्यात आली. रुग्णांना त्यांच्या गावातून रुग्णालयात आणणे, शस्त्रक्रिया करणे आणि पुन्हा घरी पोहोचविणे अशी सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली. रोटरी फाउंडेशनच्या ग्लोबल ग्रॅण्ट अंतर्गत दर्शन रोटरी आय केअर हॉस्पिटलसाठी अत्याधुनिक ओसीटी मशीन उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण प्रकल्पही याच वर्षात मंजूर झाला. या पारितोषिकांसाठी क्लबमधील सर्व सदस्यांचे योगदान महत्वाचे आहे असे प्रतिपादन अध्यक्ष विश्वनाथ मालाणी यांनी केले.

उपप्रांतपाल व ज्येष्ठ पत्रकार रो. अमोल वैद्य, सचिव रो. सौरभ म्हाळस, खजिनदार रो. संकेत काजळे, उपाध्यक्ष रो. महेश वाकचौरे यांच्यासह नरेंद्र चांडक,राजेंद्र खोसे, डॉ. किशोर पोखरकर, विकास लावरे, नूतन अध्यक्ष समीर शहा, दीपक मणियार, रवींद्र पवार, अजित काकडे, दिलीप मालपाणी, भारतभूषण नावंदर, सुनील कडलग, ओंकार सोमाणी, सीए संजय राठी, आनंद हासे, योगेश गाडे, सुनील घुले, पवनकुमार वर्मा, डॉ. विनायक नागरे, डॉ. प्रमोद राजुस्कर, संजय लाहोटी ऋषिकेश मोंढे, संदीप फटांगरे, बद्रीनारायण इंदाणी, अमित पवार, मधुसूदन करवा, डॉ. संकेत मेहता, संतोष आहेर, विक्रम पडताणी, प्रमोद मणियार यासह संपूर्ण टीमने मेहनत घेतली. दर्शन रोटरी आय केअर हॉस्पिटलचे डॉक्टर व कर्मचारी, विविध सामाजिक संस्था, देणगीदार, प्रशासन, प्रसारमाध्यमे आणि रोटरी परिवारातील सर्व सहकाऱ्यांच्या सहकार्यामुळे हे यश शक्य झाल्याचे क्लबतर्फे सांगण्यात आले. Service Above Self या रोटरीच्या ब्रीदवाक्याला केंद्रस्थानी ठेवून संगमनेर रोटरी क्लबने वर्षभर केलेल्या सेवाकार्याला मिळालेल्या या ९ पुरस्कारांमुळे क्लबच्या कार्याची जिल्हास्तरावर दखल घेतली गेली आहे.

# मंत्र्यांचे निर्णय बदलण्याचा मुख्यमंत्र्यांना अधिकार



मुंबई (वृत्तसंस्था)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आता सार्वजनिक हिताच्यादृष्टीने कोणत्याही मंत्र्याचा निर्णय बदलण्याचा कायदेशीर अधिकार प्राप्त झाला आहे. राज्य सरकारकडून 'महाराष्ट्र शासन कार्यपद्धती नियम, २०२६' अधिसूचित करण्यात आली आहे. यामुळे प्रशासकीय पातळीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अत्यंत महत्त्वाचे अधिकार प्राप्त झाले आहेत. त्यामुळे मुख्यमंत्र्यांना मंत्र्यांनी घेतलेल्या निर्णयावर हस्तक्षेप करता येणार आहे. या अधिसूचनेनुसार, सार्वजनिक हिताच्या बाबतीत मुख्यमंत्री कोणत्याही मंत्र्याने घेतलेला निर्णय बदलू शकतात. त्यामुळे आता आगामी काळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुती सरकारमधील एखाद्या मंत्र्याचा निर्णय फिरवल्यास त्याचे काय पडसाद उमटणार, हे पाहणे औत्स्युकाचे ठरेल. राज्य सरकारकडून महाराष्ट्र शासन कार्यपद्धती नियम २०२६ ही अधिसूचित करण्यात आली आहे. यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सार्वजनिक हिताच्यादृष्टीने कोणत्याही मंत्र्याचा निर्णय बदलण्याचा कायदेशीर अधिकार प्राप्त झाला आहे. त्यामुळे आता मुख्यमंत्री कोणत्याही खात्याच्या मंत्र्यांनी घेतलेल्या निर्णयात थेट हस्तक्षेप करु शकतात. या अधिसूचनेमुळे सार्वजनिक हिताच्याबाबत मुख्यमंत्री कोणत्याही मंत्र्याचा निर्णय बदलू शकतात. मात्र, एखाद्या मंत्र्याने घेतलेला निर्णय फिरवताना मुख्यमंत्र्यांना लेखी स्वरुपात आपली नोंद करावी लागेल. कोणत्याही विभागाच्या प्राथमिक कामकाजाची जबाबदारी त्या मंत्र्यांचीच राहील. परंतु, या नियमामुळे मुख्यमंत्री असतील, मंत्री असेल किंवा मुख्य सचिव आणि इतर सचिवांच्या कार्यपद्धतीबाबत आणि अधिकाराबाबत त्याबाबत स्पष्टता देण्यात आली आहे.

# कामगारांच्या विविध मागण्यांसाठी भारतीय मजदूर संघाचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा



युवावार्ता(प्रतिनिधी)

अहिल्यानगर : कामगार व कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे केंद्र व राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी भारतीय मजदूर संघ, अहिल्यानगर जिल्हा यांच्या वतीने 'मागणी दिवस' निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. कामगारांच्या मागण्यांबाबत शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

भारतीय मजदूर संघाच्या केंद्रीय कार्यसमितीच्या बैठकीत देशभरातील कामगार व कर्मचाऱ्यांच्या दीर्घकाळापासून प्रलंबित प्रश्नांसाठी १७ ऑगस्ट रोजी 'मागणी दिवस' आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार अहिल्यानगर जिल्ह्यातही विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन देण्यात आले. यामध्ये ईपीएस-९५ अंतर्गत किमान पेन्शन १ हजार रुपयांवरून ७ हजार ५०० रुपये प्रतिमाह करावी व ती व्हीडीए सोबत जोडावी, तसेच आयुष्मान भारत योजनेशी पेन्शनधारकांना जोडावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. EPF, ESIC व बोनसच्या गणनेसाठी वेतनाची कमाल मर्यादा दुप्पट करावी, जुनी पेन्शन योजना (OPS) पुन्हा लागू करावी, तसेच ग्रॅच्युइटीची गणना १५ दिवसांऐवजी ३० दिवसांच्या वेतनानुसार करावी, अशी मागणीही करण्यात आली.

सर्व कर्मचाऱ्यांना, कंत्राटी कर्मचाऱ्यांसह, 'समान कामासाठी समान वेतन' लागू करावे. जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतीनुसार किमान वेतनात वाढ करावी आणि अंगणवाडी, आशा, मिड-डे-मील, NHM आदी योजनांमधील कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. तसेच बँकांमध्ये आठवड्यातून पाच दिवस कामकाजाची व्यवस्था लागू करावी, कामगारविरोधी तरतुदी दूर करण्यासाठी लेबर कोडमध्ये योग्य दुरुस्ती करावी, हेवी इंजिनिअरिंग कंपनी, रांची तसेच आठ राज्यांतील २३ नॅशनल टेक्सटाईल मिलमधील कामगार व कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवावेत अशी मागणी करण्यात आली.

भारतीय जीवन विमा निगम मधील पदव्युत्तर विकास अधिकाऱ्यांना नोकरीची सुरक्षा द्यावी, कोणत्याही प्रकारची बडतर्फी किंवा वेतनकपात करू नये, तसेच कनिष्ठ व वरिष्ठ सहाय्यकांच्या वेतनातील विसंगती दूर करून दोन्ही पदांचे एकत्रीकरण करावे अशा मागण्यांचाही निवेदनात समावेश आहे. कामगारांची सामाजिक सुरक्षा, आर्थिक न्याय, योग्य वेतन, रोजगाराची सुरक्षितता आणि सन्मानजनक कामाचा हक्क यासाठी शासनाने या मागण्यांवर तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी भारतीय मजदूर संघाचे प्रदेश महामंत्री किरण मिलगी, प्रदेश सचिव ज्ञानेश्वर जाधव, जिल्हाध्यक्ष सुजीत उदरभरे, जिल्हा सचिव कृष्णा साठे, प्रदीप भाटे, सुनील मुंगसे, संतोष जेजुरकर, राधेश्याम कुलकर्णी, सचिन पाटील, अमोल आभाळे, प्रकाश नहार, माधुरी देवढे, राहुल नेमाने, आदिनाथ पठाडे, माणिकराव सोनटक्के, आशिष डहाने, अतिश लांडगे, सतीश दिघे, सोमनाथ सावंत, गणेश कुंभारे, राजेंद्र क्षीरसागर, अजित आरोटे आदींसह विविध क्षेत्रांतील कामगार उपस्थित होते.

Regd. No. ANR/SNR/RSR/(CR)2670-2021 Rged.Dt.28/09/2001

## इंदिरा महिला ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या; राजापूर

ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर, मो. ९९२२१४१५८६

### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरीता)

इंदिरा महिला ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित, राजापूर या संस्थेची ''वार्षिक सर्व साधारण सभा'' रविवार दि. २३/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थेच्या इमारतीच्या हॉलमध्ये संस्थेचे चेअरमन सौ. हासे राजश्री जिजाबा यांच्या अध्यक्षतेखाली पुढील विषयांचा विचार विनिमय करणे करिता आयोजित केलेली आहे. तरी सर्व सभासद भगिनींनी सदर सभेस अवश्य वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती. कळावे.


**सभेपुढे येणारे विषय** दि. ०६/०७/२०२५

१. नियोजित अध्यक्ष साहेबांना अध्यक्षस्थान स्विकारण्यास विनंती करणे.
२. मागील सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
३. ३१ मार्च २०२६ अखेरचा वार्षिक ताळेबंद, नफा-तोटा पत्रके वाचून कायम करणे.
४. ३१ मार्च २०२६ अखेर संपणाऱ्या कामकाजावरील ऑडीट मेमोची नोंद घेणे.
५. सन २०२६-२७ करीता अंतर्गत लेखापरीक्षक व शासकीय ऑडीटरची नेमणुक करणे व मानधन ठरविण्याबाबत.
६. मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२५-२६ नफा विभागणीस मान्यता घेणे.
७. थकबाकी संबंधात निर्णय घेणे व कलम १०१ ची कार्यवाही करण्याचे अधिकार संचालक मंडळास देणे.
८. सन २०२६-२७ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे व मागील अंदाजपत्रकापेक्षा कमी अधिक झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
९. संचालक व त्यांचे नातेवाईक यांची कर्जे जाहिर करणे.
१०. संस्थेच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी बँका व संस्था यांच्याकडून कर्ज घेणे, देणे, ठेवी स्विकारणे व ठेवी ठेवण्याचा अधिकार संचालक मंडळास देणे.
११. सन २०२३ मधील न नेलेला डिव्हिडंड रिझर्व फंडात वर्ग करणे.
१२. मागील दोष दुरूस्ती अहवालाबाबत विचार विनिमय करणे.
१३. सभासद व कर्मचारी प्रशिक्षण घेण्याबाबद
१४. मा. अध्यक्ष साहेब यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार विनिमय करणे.

मा.संचालक मंडळाच्या आदेशाने
श्री. खतोडे भाऊसाहेब रामभाऊ (मॅनेजर)
इंदिरा महिला ग्रा. बि. शेती सह. पत. मर्या., राजापूर

टिप : १) गणपुर्तीअभावी सभा तहकुब झाल्यास त्याचठिकाणी ३०मि. थांबुन सभा सुरू करण्यात येईल व त्यास सभेचे कामकाज पुर्ण केले जाईल. त्यास गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.

# शिष्यवृत्ती परीक्षेत ऋतुपर्णची बाजी; राज्यात ७ वा, जिल्ह्यात १ ला



संगमनेर - स्ट्रॉबेरी इंग्लिश मिडीयम स्कूल, संगमनेर येथील विद्यार्थी ऋतुपर्ण निता राहुल गायकवाड याने उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता सातवीमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. महाराष्ट्र राज्याच्या गुणवत्ता यादीत सातवा क्रमांक, तर अहिल्यानगर जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक मिळवत त्याने आपल्या गुणवत्तेची दमदार छाप उमटवली आहे. ऋतुपर्ण हा अभ्यासाबरोबरच विविध स्पर्धा परीक्षा, क्रीडा, शालेय उपक्रम आणि विविध स्पर्धांमध्ये सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करणारा विद्यार्थी आहे. स्पर्धा परीक्षांमध्ये तो नेहमीच राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळवत असून, एक अष्टपैलू विद्यार्थी म्हणून त्याने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

ऋतुपर्णच्या या यशामागे त्याची आई सौ. निता गायकवाड व वडील राहुल गायकवाड यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांनी त्याला वेळोवेळी मार्गदर्शन करून अभ्यासासाठी प्रोत्साहन दिले.प्रत्येक टप्प्यावर त्याला प्रेरणा देण्याचे काम केले. पालकांचे सातत्यपूर्ण प्रोत्साहन आणि पाठबळ हे ऋतुपर्णच्या यशाचे महत्त्वाचे कारण ठरले आहे. दिलीप शेटे सर यांनी ऋतुपर्णला वेळोवेळी सातत्यपूर्ण मार्गदर्शन केले. अभ्यासातील अडचणी समजून घेऊन योग्य दिशा दाखविण्यासोबतच त्याच्यातील क्षमता ओळखून त्याला पुढे जाण्यासाठी प्रोत्साहित केले.

ऋतुपर्णच्या शाळेच्या संस्थापिका संज्योत वैद्य, प्राचार्य रमेश दिघे , तसेच सर्व शिक्षकवृंद यांनीही त्याच्या गुणवत्तेला योग्य दिशा देत वेळोवेळी मार्गदर्शन व प्रेरणा दिली. शाळेतील सकारात्मक शैक्षणिक वातावरण, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे प्रोत्साहन यामुळे ऋतुपर्णला विविध क्षेत्रांत आपली गुणवत्ता सिद्ध करता आली. अभ्यासातील सातत्य, जिद्द, मेहनत, शिस्त आणि कोणतेही आव्हान स्वीकारण्याची वृत्ती या गुणांच्या जोरावर ऋतुपर्णने हे उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शैक्षणिक क्षेत्राबरोबरच क्रीडा, विविध स्पर्धा आणि शालेय उपक्रमांमध्येही अग्रस्थानी राहणारा ऋतुपर्ण एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणून पुढे येत आहे.

ऋतुपर्णच्या या उल्लेखनीय यशामुळे संगमनेर तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भर पडली असून सर्व स्तरातून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# पोखरी हवेली जि. प. शाळेत स्वातंत्र्य दिन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पोखरी हवेली येथे स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात व देशभक्तीपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य डॉ. नारायणराव जाधव होते.

यावेळी ग्रामपंचायत सरपंच सुदाम खैरे, उपसरपंच सोमनाथ थिटमे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन आगळे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष ह. भ. प. रघुनाथ महाराज गवांदे, उपाध्यक्ष डॉ. नारायण कोल्हे, युवा कार्यकर्ते चिराग खेराणी, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी अनिता माळी, ग्राम महसूल अधिकारी पूनम वैतकर, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य किरण गवांदे, दिपाली वाजे, शुभांगी गवांदे, सुवर्णा वाकचौरे,गोरख गवांदे यांच्यासह पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते विद्यार्थ्यांचे मुलींचे लेझीम पथक व मुलांचे झांज पथक. क्रीडा प्रशिक्षक डॉ. नारायण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या शिस्तबद्ध व जोशपूर्ण प्रात्यक्षिकांनी उपस्थित मान्यवर तसेच पालकांचे लक्ष वेधून घेतले. कवायत, वक्तृत्व व नृत्य यामधील विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसरात देशभक्तीचा उत्साह संचारला होता. पालक व ग्रामस्थांच्या लक्षणीय उपस्थितीमुळे स्वातंत्र्य दिनाचा हा सोहळा उत्साहपूर्ण आणि संस्मरणीय ठरला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक एकनाथ साबळे, दस्तगीर शेख, शकुंतला शेळके,नंदा कोटकर,सोनाली बागुल,सखाराम पाटील, राजेंद्र सूर्यवंशी, सोमनाथ मदने, अंगणवाडी सेविका जयश्री घुले, अर्चना गवांदे, वैशाली घुले यांनी विशेष परिश्रम घेतले.

## संपादकीय...

# मानवतेचा स्पर्शच जगाला माणूसपण देतो

जग कितीही आधुनिक झाले, विज्ञान-तंत्रज्ञानाने कितीही प्रगती केली, तरी माणुसकीचे महत्त्व कधीही कमी होऊ शकत नाही. उलट युद्ध, नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ, भूकंप, पूर, महामारी, विस्थापन आणि गरिबीच्या संकटांनी ग्रासलेल्या जगात मानवतेची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. १९ ऑगस्ट रोजी साजरा केला जाणारा 'जागतिक मानवतावादी दिन' हा केवळ एक स्मरणदिन नसून संकटात सापडलेल्या प्रत्येक माणसाच्या मदतीसाठी पुढे येण्याची सामूहिक जबाबदारी अधोरेखित करणारा दिवस आहे. मानवतावादी कार्य म्हणजे केवळ मदत देणे नव्हे; तर संकटग्रस्त व्यक्तीच्या वेदना समजून घेणे, त्याला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देणे आणि कठीण काळात त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे होय. जात, धर्म, भाषा, प्रदेश, देश किंवा सामाजिक स्थिती यांचा विचार न करता गरजू व्यक्तीपर्यंत मदतीचा हात पोहोचविणे हीच खरी मानवता आहे. आज जगाच्या अनेक भागांत संघर्ष आणि युद्ध सुरू आहेत. हजारो कुटुंबे घरापासून दूर झाली आहेत. अनेक निरपराध नागरिकांना अन्न, पाणी, निवारा आणि आरोग्यसेवेसाठी संघर्ष करावा लागत आहे. दुसरीकडे पूर, भूकंप, चक्रीवादळ, भूस्खलन आणि दुष्काळ यांसारख्या नैसर्गिक आपत्ती मानवी जीवन उद्ध्वस्त करतात. अशा परिस्थितीत डॉक्टर, परिचारिका, बचाव पथके, स्वयंसेवक, सामाजिक संस्था आणि स्थानिक नागरिक स्वतःचा जीव धोक्यात घालून मदतकार्य करतात. त्यांचे योगदान खऱ्या अर्थाने मानवतेचे प्रतीक आहे. मानवतावादी मदत ही केवळ मोठ्या संस्थांची जबाबदारी नाही. समाजातील प्रत्येक व्यक्ती आपल्या परीने मानवतेची सेवा करू शकते. रक्तदान करणे, गरजू विद्यार्थ्याला शैक्षणिक मदत करणे, भुकेल्याला अन्न देणे, वृद्ध आणि दिव्यांग व्यक्तींना आधार देणे, आपत्तीच्या काळात मदतकार्य करणे किंवा एखाद्या निराश व्यक्तीचे मनोबल वाढविणे- हीदेखील मानवतेचीच रूपे आहेत. आज सोशल मीडियाच्या युगात संवेदनशीलतेसोबत जबाबदारीचीही गरज आहे. संकटग्रस्त व्यक्तींचे फोटो किंवा माहिती केवळ प्रसिद्धीसाठी प्रसारित करण्याऐवजी त्यांना प्रत्यक्ष मदत कशी मिळेल, याचा विचार झाला पाहिजे. मानवतेच्या नावाखाली व्यक्तीचा सन्मान दुखावला जाणार नाही, याची काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. भारताच्या संस्कृतीत 'वसुधैव कुटुंबकम्' ही संकल्पना प्राचीन काळापासून रुजलेली आहे. संपूर्ण जग हे एक कुटुंब आहे, ही भावना प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याची आज अधिक गरज आहे. संकट कोणत्याही व्यक्तीवर येऊ शकते; त्यामुळे दुसऱ्याच्या दुःखाकडे पाहताना 'तो कोण?' यापेक्षा 'मी त्याच्यासाठी काय करू शकतो?' हा प्रश्न महत्त्वाचा ठरला पाहिजे. जागतिक मानवतावादी दिन आपल्याला एक साधा पण अत्यंत प्रभावी संदेश देतो-मानवतेपेक्षा मोठा धर्म नाही आणि संकटात मदतीचा हात देण्यापेक्षा मोठी सेवा नाही. जगाला अधिक शांत, सुरक्षित आणि संवेदनशील बनवायचे असेल, तर प्रत्येकाने आपल्या कृतीतून माणुसकी जपली पाहिजे. कारण शेवटी तंत्रज्ञान जग बदलू शकते; पण मानवतेचा स्पर्शच जगाला माणूसपण देतो.


### स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस

(नमुना झेड)

नियम पोटनियम १०७ (११) (ड -१) स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस

जा.क्र. ०७/२६ विवअ./म.स.का.क्र. १५६ / स्थावर ताबा
दिनांक : १७/०८/२०२६

वाचावे

१) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, संगमनेर यांनी पारित केलेला म.स.का.क्र. १०१ अन्वये वसुली दाखला क्र. ३७०/२०२५
दिनांक : २७/०२/२०२५
२) मा. विशेष वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम क्रमांक १०७, अन्वये दिलेल्या नोटीस अनुक्रमे -
अ) थकबाकी मागणी नोटीस १०७ (३) अन्वये दिनांक ०५/०५/२०२५
ब) जंगम जप्ती पूर्वी नोटीस १०७ (५) अन्वये दिनांक १८/०८/२०२५
क) स्थावर जप्ती हुकूम १०७ (१०) अन्वये दिनांक ०६/१०/२०२५
जं. पंचनामा -१३/०९/२०२५
त्या अर्थी कर्जदार श्री./सौ. भिमराज जयराम म्हस्के, रा. गुंजाळवाडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी कर्ज थकबाकी रक्कम जमा करणेस कसूर केल्यामुळे थकबाकी कर्जदाराला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे. विशेष करून कर्जदार व जामिनदार नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेची खाली सही करणाऱ्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १०७ (११) (ड-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार दिनांक १७/०९/२०२६ या दिवशी मालमत्तेचा ताबा घेतला आहे.
ज्या अर्थी सदर मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या. ता. संगमनेर जि. अहिल्यानगर यांच्या कर्जाचा बोझा रक्कम असे एकूण वसुली खर्चास अधीन राहावे लागेल.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

| वसुली दाखला क्र. | मालमत्ता मिळकत धारकाचे नाव | गावाचे नाव | गट नं./सि.स. नं. ग्रा.पं. मालमत्ता | क्षेत्रफळ | मिळकतीची चतुःसीमा |
|---|---|---|---|---|---|
| ३७०/२०२५ | भिमराज जयराम म्हस्के | गुंजाळवाडी | २१८/५६/३ | ०.०२.५० | नकाशा प्रमाणे |

सदर नोटीस आज दिनांक १७/०८/२०२६ रोजी माझ्या सही व कार्यालयीन मुद्रेसह दिला असे.

१) कर्जदार :- श्री./सौ. - भिमराज जयराम म्हस्के
गुंजाळवाडी, संगमनेर
२) जामिनदार :- श्री./सौ. - विलास कारभारी पावबाके
रा. पावबाकी, ता. संगमनेर
३) जामिनदार :- श्री./सौ. - भाऊसाहेब कारभारी पावबाके
रा. पावबाकी, ता. संगमनेर

विशेष टिप - मा. विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचे समन्स, नोटीस घेण्यास टाळाटाळ करणे त्यास प्रतिबंध करणे, आदेश नाकारणे, वसुली कामी अडथळे निर्माण करणे इ. बेकायदेशीर कृत्य आपणाकडून घडल्यास कायद्यानुसार आपणावर दंडात्मक कारवाई होऊन कैदेच्या शिक्षेची तरतूद आहे. याची थकबाकीदारांनी व जामिनदारांनी विशेष नोंद घ्यावी.

एन. एस. यादव
विशेष वसुली व विक्री अधिकारी
मो. ९८२२१०११५६
महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या.
संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर


# श्री श्री रविशंकर विद्या मंदिरात ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा



युवावार्ता (प्रतिनिधी)

एज्युकेशन संचालित श्री श्री रविशंकर विद्या मंदिर, संगमनेर येथे देशभक्ती, उत्साह आणि राष्ट्रप्रेमाच्या वातावरणात भारताचा ८०वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात आणि दिमाखात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्यदिन हा केवळ उत्सवाचा दिवस नसून स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करून देशाप्रती आपली जबाबदारी जाणून घेण्याचा दिवस आहे. कार्यक्रमाला संस्थेच्या अध्यक्षा सौ. स्वाती शाह, मुख्याध्यापिका आरती सप्रा, समन्वयक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भारतीय सैन्यदलात कार्यरत असलेले दत्तात्रय मुंढे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी तिरंग्याला मानवंदना देण्यात आली आणि त्यानंतर सुमधुर राष्ट्रगीताने वातावरण भारावून गेले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूर्वी जोशी व अक्षरा हासे यांनी प्रभावीपणे केले. स्वागतपर मनोगतानंतर विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यदिनाचे ऐतिहासिक महत्त्व, स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान आणि आजच्या पिढीची देशाप्रती असलेली कर्तव्ये याविषयी विचार मांडले. Where the mind is without fear and the head is held high या रवींद्रनाथ टागोर यांच्या प्रेरणादायी विचारांनी कार्यक्रमाला सुरुवात झाली. सांस्कृतिक इयत्ता पाचवी व सहावीच्या विद्यार्थ्यांनी 'कोटी कोटी कंठातून' हे सुंदर देशभक्तीपर गीत सादर करून वातावरण भारावून टाकले. इयत्ता सातवी, आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांनी 'जय जय भारत माता' हे देशभक्तीपर गीत सादर करून राष्ट्रप्रेमाची भावना जागृत केली. तसेच इयत्ता दहावीतील अनन्या गुंजाळ हिने इंग्रजी भाषेत स्वातंत्र्य, राष्ट्रनिर्मिती आणि आजच्या युवकांची भूमिका यावर प्रभावी भाषण केले.

यानंतर पूर्व-प्राथमिक विभागातील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर गीतांवर आकर्षक योगा नृत्य सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. तसेच इयत्ता सहावी, सातवी व आठवीतील विद्यार्थिनींनी 'तिरंगा' या संकल्पनेवर आधारित देशभक्तीपर नृत्य सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. चिमुकल्यांच्या निरागस सादरीकरणापासून ते मोठ्या विद्यार्थ्यांच्या जोशपूर्ण नृत्यापर्यंत प्रत्येक सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून राष्ट्रीय एकात्मता, विविधतेतील एकता, देशप्रेम आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांच्या माध्यमातून स्वातंत्र्याचे महत्त्व आणि देशासाठी काहीतरी सकारात्मक करण्याची प्रेरणा व्यक्त केली.

यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्याचा खरा अर्थ समजावून सांगताना शिस्त, प्रामाणिकपणा, स्वच्छता, शिक्षण, पर्यावरणसंवर्धन आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांसारख्या मूल्यांचा स्वीकार करण्याचे आवाहन केले. देशाची प्रगती ही केवळ सरकारची किंवा काही व्यक्तींची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाच्या योगदानातून ती साध्य होते, असा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला.

## मिठाई दुकान ३४ दिवस बंद

# एफडीएला ५ लाखांचा दंड

मुंबई (वृत्तसंस्था)

आपल्या धडाकेबाज कारवायांमुळे चर्चेत आलेल्या अन्न व औषध प्रशासन विभागाला एक मोठा धक्का बसला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने एफडीएला पाच लाखांचा दंड ठोठावला आहे. तपासणीत नियमांचं ९८ टक्के अनुपालन करूनही पुण्यातील मिठाईचं दुकान ३४ दिवस बंद राहिल्याप्रकरणी उच्च न्यायालयाने एफडीएला पाच लाखांचा दंड ठोठावला आहे. तसेच एफडीएचा आदेश रद्द करत दुकान खुलं करण्यास उच्च न्यायालयाने परवानगी दिली.

पुनर्तपासणी करण्यामागील उद्देश कौतुकस्पद असला तरी एफडीए गरजेपेक्षा जास्त कठोरपणे कारवाई करत असल्याचं तसेच एफडीएचे धोरण विचित्र असल्याची टिप्पणी उच्च न्यायालयाने केली. अन्नविषबाधेच्या तक्रारीनंतर १२ जूनला एफडीएने पुण्यातील गुरुनानक डेअरीची तपासणी करून स्वच्छता आणि कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक स्वच्छतेबाबत चिंता व्यक्त करत दुकानाचा परवाना निलंबित केला होता. पुनर्तपासणीत नियमांच ९८ टक्के अनुपालन आढळल्यानंतर मालकाने एफडीएकडे निलंबनाचे आदेश मागे घेण्यासाठी निवेदन सादर केलं होतं. मात्र एफडीएने त्यावर कोणतेही कारवाई न केल्यानंतर मालकाने उच्च न्यायालयात धाव घेतली.

दरम्यान, १२ जूनच्या कारवाईपासून दुकान ३४ दिवस बंद असल्याने ८.७४ लाखांचे नुकसान झाल्याचा दावा करत दुकानदाराने याचिका दाखल केली होती. ही याचिका लक्षात घेऊन उच्च न्यायालयाने एफडीएला पाच लाख नुकसान भरपाईचे आदेश दिले. या आधीही उच्च न्यायालयाने एफडीएची कानउघाडणी केली होती.

# नान्नज विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - श्री संत ज्ञानेश्वर माऊली विद्यालय नान्नज दुमाला येथे ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण प्रसंगी विविध देशभक्तीपर व प्रेरणादायी कार्यक्रम संपन्न झाले अशी माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक एच. आर. सोनवणे यांनी दिली. विद्यालयाचे ध्वजारोहण सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज संस्थेचे संचालक व स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन बाबासाहेब कडनर, व्हाईस चेअरमन विठ्ठल गायकवाड यांनी केले.

प्रसंगी स्थानिक स्कूल कमिटीचे सर्व ज्येष्ठ सदस्य, नान्नज दुमाला केंद्रप्रमुख, सरपंच, तसेच ग्रामस्थ व माजी विद्यार्थी उपस्थित होते. सकाळी प्रसन्नमय वातावरणात विद्यालयातील विद्यार्थ्यांनी हातामध्ये तिरंगी ध्वज घेत व देशभक्तीपर व पर्यावरण विषयक घोषणा देत गावातून प्रभात फेरी काढली. प्रसंगी गावातील ध्वजारोहण ग्रामपंचायत नान्नज दुमालाचे ग्रामविकास अधिकारी प्रभाकर राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. स्वातंत्र्यदिनानिमित्त विद्यालयातील झाडांची रंग सजावट करत तसेच मैदान परिसरात खांब व झाडांना तिरंगी फुगे, तिरंगी पताका व आकर्षक रांगोळीने सजावट करण्यात आली. यावेळी ध्वजारोहण प्रसंगी स्काऊट गाईड संचलन तसेच संगीत कवायत घेण्यात आली. ८० व्या स्वातंत्र्य दिन प्रसंगी विद्यालयात तिरंगा, तेरी मिट्टी, फिर भी दिल है हिंदुस्तानी, देश रंगीला, संदेशे आते है, देश मेरे, तेरी मिट्टी मे मिल जावा, तसेच लहरा दो अशा देशभक्तीपर गीतावर आधारित ३५ विद्यार्थिनींनी नृत्य कार्यक्रम सादर केले. तसेच हर घर तिरंगा अभियानांतर्गत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यावर आधारित मराठी हिंदी व इंग्रजीतून प्रेरणादायी भाषणे केली. यावेळी असाक्षरमुक्त गाव व कॉपीमुक्त अभियान व तंबाखू मुक्त शपथ सर्व विद्यार्थ्यांना ईश्वरी चत्तर हिने दिली. कार्यक्रम प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते एसएससी मार्च २०२६ मधील गुणवंत विद्यार्थी तसेच पाचवी, सातवी,आठवी शिष्यवृत्ती परीक्षा व इयत्ता आठवी राष्ट्रीय आर्थिक दृष्ट्या दुर्बल शिष्यवृत्ती परीक्षा( एन एम एम एस) मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मेडल देऊन सत्कार करण्यात आला. सदर विद्यार्थ्यांना काकडवाडी येथील ग्रामस्थ दत्तात्रय बाबुराव गायकवाड व बाबासाहेब बाबुराव गायकवाड यांचे तर्फे गायकवाड पारितोषिक तसेच आदर्श शिक्षक एस. डी. गायकवाड सर यांचे तर्फे मातोश्री स्व. जयवंताबाई दशरथ गायकवाड स्मृती पारितोषिक व विवेकानंद वाघ सर यांचे कडून स्व. संजय सुखदेव वाघ स्मृती पारितोषिक विद्यार्थ्यांना देण्यात आले.

# दरोड्याच्या गुन्ह्यातील फरार आरोपी अखेर पोलिसांच्या जाळ्यात



युवावार्ता (प्रतिनिधी)

कोपरगाव - दरोड्यासारख्या गंभीर गुन्ह्यात दीड वर्षांहून अधिक काळ पोलिसांना गुंगारा देऊन फरार असलेल्या एका कुख्यात आरोपीच्या कोपरगाव तालुका पोलिसांनी अखेर मुसक्या आवळल्या आहेत. माहेगाव देशमुख गावात संशयास्पदरीत्या फिरणार्या या आरोपीला पोलिसांनी अत्यंत शिताफीने आणि फिल्मी स्टाईलने जेरबंद केल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

शुक्रवारी १६ ऑगस्टच्या मध्यरात्रीच्या सुमारास, माहेगाव देशमुख गावात एक इसम संशयित बेकायदेशीर कृत्य करण्याच्या उद्देशाने फिरत असल्याची गोपनिय माहिती कोपरगाव तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांना मिळाली. मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे त्यांनी तातडीने एक विशेष पथक तयार केले. या पथकात पोलीस उपनिरीक्षक कमलाकर चौधरी, पोलीस कॉन्स्टेबल रशीद शेख, प्रकाश नवाळे, सागर शेवाळे, वाहन चालक अनिल फाळके आणि गृहरक्षक जवान अमोल तासकर यांचा समावेश होता.

पथक तत्काळ घटनास्थळी रवाना झाले आणि माहेगाव देशमुख गावातील गणपती मंदिराच्या परिसरात पोहोचले. यावेळी पोलिसांना अंधाराचा फायदा घेऊन स्वतःचे अस्तित्व लपवण्याचा प्रयत्न करणारा आणि पोलीस गाडी येताच पळून जाण्याच्या तयारीत असलेला एक इसम दिसून आला. सतर्क पोलिसांनी कोणत्याही प्रकारचा विलंब न लावता तातडीने धाव घेत त्या इसमास मोठ्या चलाखीने आणि शिताफीने ताब्यात घेतले. त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव कार्तिक गुलाब निकम (रा. माहेगाव देशमुख, ता. कोपरगाव) असल्याचे सांगितले. पोलिसांच्या कचाट्यात सापडल्यानंतर तो उडवा-उडवीची उत्तरे देऊ लागला, ज्यामुळे पोलिसांचा संशय अधिकच बळावला.

पोलिसांनी त्याला तात्काळ ताब्यात घेऊन कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात आणले आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १२२ अन्वये कायदेशीर कारवाई केली. मात्र जेव्हा पोलिसांनी या इसमाचे जुने रेकॉर्ड आणि कुख्यात इतिहास तपासला, तेव्हा पोलिसांच्या अंगाचा थरकाप उडाला. हाच तोच सराईत आरोपी होता, जो श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गंभीर गुन्ह्यात (गुन्हा रजिस्टर क्रमांक १०२/२०२५, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१०(२) आणि ३३१(६) प्रमाणे) दीड वर्षांपासून फरार घोषित करण्यात आला होता.या गुन्ह्याची पार्श्वभूमी अत्यंत थरारक होती. १ मार्च २०२५ रोजी रात्री एक वाजेच्या सुमारास, खानापूर (ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) येथे राहणार्या ७९ वर्षांच्या वृद्ध फिर्यादी विजयादेवी लक्ष्मणराव भोपळे यांच्या घरात रात्रीच्या अंधाराचा गैरफायदा घेत सहा दरोडेखोरांनी धुमाकूळ घातला होता. कोयत्याचा धाक दाखवून आणि वृद्धेचे तोंड दाबून या नराधमांनी त्यांच्या घरातील सोन्याचे दागिने आणि रोख रकमेसह तब्बल ९ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल बळकावला होता आणि पोबारा केला होता. याआधीच्या तपासात पोलिसांनी यातील काही साथीदारांना गजाआड केले होते.


**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME IS
SUNIL RAOSAHEB KHEMNAR
(BOARD CERTIFICATE)
TO NEW NAME AS
SUNIL RAVASAHEB KHEMNAR
(AADHAR NO. 58082633 7510)
FROM VIDEAFFIDAVIT BEFORE NOTARYPUBLIC SANGAMNAR
PLACE:SANGAMNAR
DATE: 16/08/2026

**पाहिजेत**

सुंदरम गोल्ड आणि प्लास्टिक, संगमनेर
ऑफसेट मशिन ऑपरेटर १ जागा
स्क्रिन प्रिटींग – २ जागा
टेलीकॉलर – २ (महिला)
– संपर्क –
९८२२४५३०३६

**JOB**

SR THORAT — GAGANGIRI PACKAGED PURITY

| Sr. No. | Post | QTY | Qualification and Experience |
|---|---|---|---|
| 1 | Security Guard | 5 | Experience Minimum 5 Year (Ex-Servicemen preferred) |
| 2 | Fitter/Welder/ Mechanical/ Electrical/ Refrigeration | 5 | ITI,DME or any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 3 | Data Operator/ Supervisor | 5 | Any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 4 | Chemist | 5 | B.Sc. Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |

Office Address-S.R.Thorat Milk Products Pvt.Ltd, Rajapur Road,Sangamner, Dist- Ahilyanagar
Mobile Number – 9860100936/937
Sent the CV Following E-Mail Id:
admin@srthoratmilk.com / hr@srthoratmilk.com






**पाहिजेत**

श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर्स्
श्री गणेश टायर्स
श्री गणेश ऑइल सेंटर
या फर्मसाठी
अकाऊंटंट - 2 जागा
पुरूष - टॅली आणि एक्सेलचे ज्ञान अवश्यक
कामाचा अनुभव आवश्यक
८९९९८६२७५९

नेवासकर ऑटोमोबाईल्स
**पाहिजेत**
सर्व्हीस सुपरव्हायझर
२ जागा
संगमनेर
8793223344
8446300400

**पाहिजेत**

डाटा एन्ट्री ऑपरेटर - २
शिक्षण - ग्रॅज्युवेट/१२ वी –
डायलिसिस टेक्निशियन -२
कॅथलॅब टेक्निशियन - १
नर्सिंग सुपरवाईझर -१
कुटे हॉस्पिटल
ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,
8888882225
9766855593

**फ्लॅट विकणे आहे**

2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
– संपर्क –
8788945208
8208223721

## दिनविशेष

१९९९: — बेल ग्रेड, युगोस्लाव्हियात हजारो सर्बियन लोकांचे राष्ट्राध्यक्ष स्लोबोदान मिलोसेव्हिच यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन.

१९९१: — सोविएत संघाच्या राष्ट्राध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्हला फोरोस येथे सुटीवर असताना नजरकैदेत घातले गेले.

१९४५: — होची मिन्ह व्हिएतनामच्या सत्तेवर आले.

१९१९: — अफगाणिस्तानला युनायटेड किंगडमपासून स्वातंत्र्य मिळाले.

१९०९: — इंडियानापॉलिस मोटर स्पीडवे येथे मोटारींची पहिली शर्यत.

१८५६: — गेल बॉर्डन या शास्त्रज्ञाला दुधाच्या शीतकरण प्रक्रियेचे पेटंट.

०२९५: — प्रेम, सौंदर्य आणि प्रजनन यांची रोमन देवी व्हीनसचे पहिले मंदिर पूर्ण झाले.

## जन्म

२०१५: सनत मेहता — भारतीय कार्यकर्ते आणि राजकारणी

२०१३: अब्दुल रहीम हातिफ — अफगाणिस्तान देशाचे ८वे राष्ट्राध्यक्ष, राजकारणी (जन्म: २० मे १९२६ )

२००९: डॉन हेविट — अमेरिकन टेलिव्हिजन ६० मिनिटस् मासिकाचे संस्थापक (जन्म: १४ डिसेंबर १९२२ )

२००८: लेवी मवानवासा — झांबिया देशाचे ३रे राष्ट्रपती, वकील आणि राजकारणी (जन्म: ३ सप्टेंबर १९४८ )

२००३: कार्लोस रॉबर्टो रीना — होंडुरास देशाचे अध्यक्ष, होंडुराचे वकील आणि राजकारणी (जन्म: १३ मार्च १९२६ )

२०००: बिनेंश्वर ब्रह्मा — भारतीय कवी, लेखक, आणि शिक्षक (जन्म: २८ फेब्रुवारी १९४८ )

१९९४: लिनस कार्ल पॉलिंग — अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ आणि अण्वस्त्रांच्या विरोधात लढणारे सामाजिक कार्यकर्ते — नोबेल पुरस्कार (जन्म: २८ फेब्रुवारी १९०१ )

१९९३: उत्पल दत्त — भारतीय रंगभूमी आणि चित्रपट कलाकार (जन्म: २९ मार्च १९२९ )

१९९३: य. द. लोकुरकर — निर्भिड पत्रकार

१९९०: रा. के. लेले — पत्रकार, संशोधक

## मृत्यू

१९६७: खंड्रो रिनपोचे — भारतीय आध्यात्मिक नेते

१९६७: सत्या नाडेला — भारतीय-अमेरिकन व्यवसाय कार्यकारी, मायक्रोसॉफ्टचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी

१९५९: संजय सूरकर — भारतीय दिग्दर्शक आणि पटकथालेखक (निधन: २७ सप्टेंबर २०१२ )

१९५१: सुधा मूर्ती — भारतीय लेखक आणि शिक्षक, इन्फोसिस फाउंडेशनच्या प्रमुख

१९४६: बिल क्लिंटन — युनायटेड स्टेट्सचे ४२वे राष्ट्राध्यक्ष, अमेरिकन वकील आणि राजकारणी

१९३७: रिचर्ड इंग्राम्स — इंग्रजी पत्रकार, The Oldie चे संस्थापक

१९३२: बनहर्न सिल्पा-अर्चा — थायलंड देशाचे २१वे पंतप्रधान (निधन: २३ एप्रिल २०१६ )

१९२८: शिवप्रसाद सिंग — भारतीय हिंदी लेखक (निधन: २८ सप्टेंबर १९९८ )

१९२४: विलार्ड बॉयल — कॅनेडियन भौतिकशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक — नोबेल पुरस्कार (निधन: ७ मे २०११ )

१९२३: एडगर एफ. कॉड — इंग्रजी संगणक शास्त्रज्ञ, डेटा रिलेशनल मॉडेलचे शोधक (निधन: १८ एप्रिल २००३ )

१९२१: जीन रोडडेबेरी — स्टार ट्रेकचे निर्माते (निधन: २४ ऑक्टोबर १९९१ )




# दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**१९ ऑगस्ट**

# मोटारस्पोर्टच्या इतिहासातील ऐतिहासिक दिवस; १९०९ मध्ये पहिली शर्यत

१९०९ हे वर्ष मोटारस्पोर्टच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानले जाते. अमेरिकेतील इंडियाना राज्यातील इंडियानापोलिस येथे उभारण्यात आलेल्या इंडियानापोलिस मोटर स्पीडवेवर मोटारींच्या शर्यतींचे आयोजन सुरू झाले. पुढील अनेक दशकांमध्ये या ठिकाणाने जगातील सर्वात प्रसिद्ध मोटारशर्यतींपैकी एक असलेल्या 'इंडियानापोलिस ५००'मुळे आंतरराष्ट्रीय ओळख मिळवली.विसाव्या शतकाच्या सुरुवातीला मोटारगाड्यांचा विकास वेगाने होत होता. त्या काळात मोटारगाड्या केवळ प्रवासाचे साधन न राहता तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकीच्या प्रगतीचे प्रतीक बनत होत्या. वाहनांची गती, इंजिनची क्षमता, टिकाऊपणा आणि चालकांचे कौशल्य तपासण्यासाठी विशेष रेस ट्रॅकची गरज निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर इंडियानापोलिस येथे मोटारस्पीडवे उभारण्याची कल्पना पुढे आली.स्पीडवेचे बांधकाम १९०९ मध्ये पूर्ण झाले. सुरुवातीच्या काळात या ट्रॅकचा पृष्ठभाग आजच्या आधुनिक डांबरी किंवा काँक्रीट रस्त्यापेक्षा वेगळा होता. ट्रॅकच्या बांधकामासाठी मोठ्या प्रमाणावर विटांचा वापर करण्यात आला होता. त्यामुळे पुढे इंडियानापोलिस मोटर स्पीडवेला 'ब्रिकयार्ड' हे प्रसिद्ध टोपणनाव मिळाले. आजही या ऐतिहासिक विटांचा काही भाग स्पीडवेवर जतन करण्यात आला आहे.१९०९ मध्ये स्पीडवेवर मोटारशर्यतींच्या आयोजनाला सुरुवात झाली. या शर्यतींमध्ये विविध मोटार कंपन्यांच्या वाहनांनी सहभाग घेतला. त्या काळातील वाहनांमध्ये आधुनिक काळातील सुरक्षा व्यवस्था नव्हती. इंजिन, ब्रेक, टायर आणि इतर यांत्रिक भागांवर मोठा ताण येत असल्याने शर्यती अत्यंत आव्हानात्मक होत्या. चालकांसाठी वेगाबरोबरच वाहनावर नियंत्रण ठेवणे आणि यांत्रिक बिघाड टाळणे ही मोठी कसोटी होती.या शर्यतींचे महत्त्व केवळ मनोरंजनापुरते मर्यादित नव्हते. मोटार उत्पादक कंपन्यांना प्रत्यक्ष रेसिंगच्या माध्यमातून आपल्या वाहनांची क्षमता तपासता आली. उच्च वेगाने वाहन चालवल्यानंतर इंजिनची कार्यक्षमता, टायरचा टिकाऊपणा, वाहनाची स्थिरता आणि इतर तांत्रिक बाबींचा अभ्यास करता आला. त्यामुळे मोटारशर्यतींचा उपयोग वाहन तंत्रज्ञानाच्या विकासासाठीही होऊ लागला.इंडियानापोलिस मोटर स्पीडवेची लोकप्रियता पुढील काळात मोठ्या प्रमाणावर वाढली. या ठिकाणी १९११ मध्ये पहिली Indianapolis 500 शर्यत आयोजित करण्यात आली. ही शर्यत पुढे जगातील सर्वाधिक प्रतिष्ठेच्या मोटारशर्यतींपैकी एक बनली.

# मायक्रोसॉफ्टला नवी दिशा देणारे सत्या नाडेला

**पुण्यतिथी विशेष**



त्या नारायण नाडेला यांचा जन्म १९ ऑगस्ट १९६७ रोजी हैदराबाद येथे झाला. भारतीय वंशाचे अमेरिकन व्यवसाय कार्यकारी म्हणून त्यांनी जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. आज ते मायक्रोसॉफ्टचे अध्यक्ष (Chairman) आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (C E O ) आहेत.नाडेला यांचे बालपण हैदराबादमध्ये गेले. त्यांचे वडील बी. एन. युगंधर हे भारतीय प्रशासकीय सेवेतील (IAS) अधिकारी होते, तर आई संस्कृतच्या व्याख्याता होत्या. हैदराबाद पब्लिक स्कूल, बेगमपेट येथे शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी मणिपाल येथील अभियांत्रिकी शिक्षण घेतले. १९८८ मध्ये त्यांनी इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगची पदवी मिळवली. त्यानंतर उच्च शिक्षणासाठी ते अमेरिकेत गेले. तेथे त्यांनी University of Wisconsin–Milwaukee येथून कॉम्प्युटर सायन्समध्ये पदव्युत्तर शिक्षण आणि पुढे University of Chicago Booth School of Business येथून MBA पूर्ण केले.करिअरच्या सुरुवातीला नाडेला यांनी Sun Microsystems येथे काम केले. त्यानंतर १९९२ मध्ये त्यांनी मायक्रोसॉफ्टमध्ये प्रवेश केला. सुरुवातीपासूनच तंत्रज्ञान, सॉफ्टवेअर आणि व्यवसाय यांचा संगम साधण्याची त्यांची क्षमता लक्षात आली. मायक्रोसॉफ्टमधील विविध जबाबदाऱ्या सांभाळताना त्यांनी ऑनलाइन सेवा, एंटरप्राइज व्यवसाय, सर्व्हर आणि टूल्स तसेच क्लाउड कम्प्युटिंग क्षेत्रात महत्त्वाचे काम केले. विशेषतः मायक्रोसॉफ्टच्या Cloud and Enterprise व्यवसायाच्या विस्तारात त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरले.फेब्रुवारी २०१४ मध्ये मायक्रोसॉफ्टच्या संचालक मंडळाने सत्या नाडेला यांची कंपनीच्या CEO पदावर नियुक्ती केली. त्यांनी स्टीव्ह बॉलमर यांच्यानंतर ही जबाबदारी स्वीकारली. CEO झाल्यानंतर नाडेला यांनी कंपनीच्या कार्यपद्धतीत आणि तंत्रज्ञानाच्या दृष्टिकोनात मोठे बदल घडवून आणले. मायक्रोसॉफ्टला पारंपरिक संगणक सॉफ्टवेअरवर अधिक अवलंबून ठेवण्याऐवजी त्यांनी क्लाउड कम्प्युटिंग, Azure, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल सेवा आणि विविध प्लॅटफॉर्मवरील तंत्रज्ञान यांना मोठे महत्त्व दिले.नाडेला यांच्या नेतृत्वाखाली मायक्रोसॉफ्टची संस्कृतीही बदलली. त्यांनी कर्मचाऱ्यांमध्ये शिकण्याची वृत्ती, सहकार्य, समावेशकता आणि सहानुभूती यांना महत्त्व दिले. त्यांचा नेतृत्वाचा दृष्टिकोन केवळ व्यवसायवाढीपुरता मर्यादित नसून तंत्रज्ञानाचा उपयोग अधिकाधिक लोक आणि संस्थांना सक्षम करण्यासाठी व्हावा, असा आहे. मायक्रोसॉफ्टच्या अधिकृत माहितीनुसार, नाडेला यांचे नेतृत्व कंपनीच्या विविध व्यवसायांना नव्या दिशेने नेण्यावर केंद्रित राहिले आहे.२०२१ मध्ये नाडेला यांची मायक्रोसॉफ्टच्या संचालक मंडळाच्या अध्यक्षपदीही नियुक्ती झाली. त्यामुळे CEO आणि Chairman अशा दोन्ही महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या प्रमुख जागतिक तंत्रज्ञान नेत्यांमध्ये त्यांचा समावेश झाला.

# महा वॉकेथॉन २०२६-वॉक फॉर वॉटर- २१ ऑगस्ट जलसंधारण दिनी राज्यभर आयोजन

शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारणाबाबत २१ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यात महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर (Maha Walkathon-Walk for Water) या उपक्रमाचे असून मृद व जलसंधारण विभागाच्यावतीने आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाची थीम सेव सॉईल, सेव वॉटर, सेक्युअर टूमारो ( Save Soil, Save Water, Secure Tomorrow) अशी असून पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा हे घोषवाक्य आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यात २१ ऑगस्ट रोजी कमाल ३ किलोमीटर (महा वॉकेथॉन) चालणे आणि मृद व जलसंधारणाची शपथ घेणे असे या कार्यक्रमाचे स्वरुप आहे.

शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारण हे आवश्यक असून त्याचे महत्त्व पटवून देण्याकरिता राज्यात १५ ते २१ ऑगस्ट, २०२६ दरम्यान 'जलसंधारण सप्ताह' आणि १५ ऑगस्ट, २०२६ ते २६ जानेवारी, २०२७ दरम्यान जलसंधारण अभियान आयोजित करण्यात येत आहे. तर २१ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यात शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारणाबाबत 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर' (Maha Walkathon-Walk for Water) या उपक्रमाचे आयोजन करुन जलसंवर्धनाला लोकचळवळीचे स्वरुप देण्याचे कार्य राज्य शासनाने हाती घेतले असून मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी या लोकचळवळीत राज्यातील सर्व नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.


राज्यस्तरीय कार्यक्रम मुंबई येथे होणार असून प्रत्येक जिल्ह्यात कार्यक्रमाच्या आयोजनाचे प्रमुख जिल्हास्तरीय मृद व जलसंधारण समितीचे अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकारी हे असणार आहेत. या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सर्व मंत्री, सर्व राज्यमंत्री, राज्यसभा/ लोकसभा/ विधानपरिषद/ विधानसभा सदस्य, सर्व जिल्हापरिषद अध्यक्ष/उपाध्यक्ष, सर्व महापौर / उपमहापौर, सर्व नगराध्यक्ष/उपनगराध्यक्ष, सर्व जिल्हापरिषद / पंचायत समिती / ग्रामपंचायत सदस्य, सर्व महानगरपालिका/ नगरपालिका/नगरपंचायत सदस्य आणि इतर स्थानिक लोकप्रतिनिधी यांना निमंत्रित करण्यात येणार आहे.

सर्व प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी, सर्व निमशासकीय अधिकारी व कर्मचारी, जिल्ह्यातील नामांकित व प्रतिष्ठित व्यक्ती / डॉक्टर / कलाकार/ उद्योजक, जिल्ह्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू, जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थी, एनसीसी, एनएसएस, माय भारत, नेहरु युवा केंद्र, भारत स्काऊट्स अँड गाईड्स, रेड क्रॉस, होमगार्ड, स्वयंसेवी संस्था, रोटरी क्लब सदस्य, लायन्स क्लब सदस्य, रनिंग क्लब सदस्य, सायकलिंग क्लब सदस्य, उद्योग व व्यापारी संघटना, सीएसआर भागीदार कंपन्या, विविध क्रीडा संघटना, गुड मॉर्निंग ग्रुप्स, विविध व्यायाम शाळा, स्वयंसेवी संस्था, महिला, राज्याचे नागरिक यांना सहभागी करण्यात येणार आहे.

**क्यूआर आधारित ऑनलाईन नोंदणी**

महा वॉकेथॉन मध्ये सहभागी होण्यासाठी क्यूआर आधारित ऑनलाईन नोंदणी करता येणार आहे. २१ ऑगस्ट रोजी महा वॉकेथॉन मध्ये सहभागी प्रत्येक व्यक्तीस ई-प्रमाणपत्र मिळणार आहे. तर प्रथम दहा विजेत्यास जिल्हास्तरावर सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाची सोशल मीडियासाठी MahaWalkathon, WalkForWater, SaveSoilSave Water हे हॅशटॅग वापरण्यात याव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.




**जलसंधारण सप्ताह**

१५ ऑगस्ट ते २१ ऑगस्ट २०२६ या जलसंधारण सप्ताह दरम्यान राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यात मृद व जलसंवर्धन रील्स स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील १५ ते ३० वयोगटातील युवक-युवतींच्या कल्पकतेचा उपयोग करुन इनस्टाग्राम (Instagram) च्या माध्यमातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात मृद व जलसंधारणाबाबत व्यापक जनजागृती निर्माण करण्यासाठी राज्यव्यापी Reel for Soil and Water Conservation स्पर्धा आयोजित करण्यात आले आहे. याची थीम Save Soil, Save Water, Secure Tomorrow अशी असून सोशल मीडियावर SaveSoil Save Water हे हॅशटॅग वापरण्यात यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. यामुळे एकाच हॅशटॅगखाली विक्रमी संख्येने रील्स तयार होऊन मोठ्या डिजिटल सहभागाची नोंद होणार आहे.

रील स्पर्धा महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरावर आयोजित करण्यात आली असून या स्पर्धेचा पात्र वयोगट १५ ते ३० वर्षे असा ठेवण्यात आला आहे. प्रत्येक स्पर्धकाने ३० ते ६० सेकंदांची Instagram Reel तयार करावी. व्हिडीओ/ रीलच्या सुरुवातीला व्हिडीओ / रीलचा उद्देश, स्वतःचे संपूर्ण नाव, जिल्ह्याचे नाव नमूद सहभागी स्पर्धकांनी करणे आवश्यक आहे. स्पर्धाकांने Reel स्वतःच्या Public Instagram account वर पोस्ट करावी. स्पर्धकांनी मृद व जलसंधारण विभागाच्या अधिकृत Instagram account ला Tag करणे बंधनकारक राहील. यासाठी अधिकृत हॅशटॅग Save Soil Save Water वापरणे अनिवार्य राहणार आहे.

स्पर्धेसाठी मान्यता दिलेला एक अधिकृत QR Code तयार करण्यात येईल. ठ डलरप केल्यानंतर नोंदणी Reel Link Submit जिल्हा निवडफ Verification ' सहभाग प्रमाणपत्र अशी सोपी प्रक्रिया असणार आहे. Instagram हॅशटॅगबरोबर स्वतंत्र डिजिटल नोंदणी केल्यामुळे शासनाकडे प्रत्येक सहभागीची अधिकृत नोंद उपलब्ध राहणार आहे. रील्स अपलोड करण्याचा कालावधी १५ ते २१ ऑगस्ट २०२६ असा आहे.

**रील्स बनवण्यासाठी विषय**

माती संवर्धन, पाणी बचत, मृदसंधारण, जलसंधारण, मातीची धूप रोखणे, पावसाच्या पाण्याचे संकलन, शेततळे, बंधारे, पाणलोट क्षेत्र विकास, वृक्षारोपण, पर्यावरण संरक्षण, गावातील यशस्वी मृद व जलसंधारण कामे, पारंपरिक मृद व जलसंधारण पद्धती, माती व पाणी वाचविण्याच्या नाविन्यपूर्ण कल्पना, आजचे संवर्धन उद्याचे सुरक्षित भविष्य असे रील्स बनवण्यासाठी विषय देण्यात आले आहेत.

रील्स बनवितांना Storytelling, acting, Music, Dance, animation, al Creative, Comedy, Short Film, Before-after, Drone Visuals किंवा अन्य नाविन्यपूर्ण पद्धतींचा वापर करता येणार आहे. मात्र रीलचा मुख्य संदेश माती आणि पाणी संवर्धनाशी संबंधित असणे आवश्यक राहणार आहे.

रील्स करिता गुणांकन पद्धती पुढील प्रमाणे असणार आहे. विषय व संदेश - ३० गुण, कल्पकता -२५ गुण, प्रभावी सामाजिक संदेश - २० गुण, सादरीकरण व तांत्रिक गुणवत्ता - १५ गुण, खर्पीरसीरा एपसरसशाशर्पी - १० गुण असे एकूण - १०० गुण असणार आहेत. केवळ Likes किंवा Followers वर विजेता निश्चित न करता तज्ज्ञ परीक्षण आणि Social Media Engagement या दोन्हींचा समतोल ठेवण्यात येणार आहे. गुणांकानुसार विजेत्याची निवड करण्यात येईल.

संपूर्ण राज्यासाठी एकच अधिकृत हॅशटॅग SaveSoilSaveWater वापरण्यात येणार असून, प्रत्येक जिल्ह्यातून किमान २५० रील्स आणि राज्यभरातून १० हजार रिल्सचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या माध्यमातून लाखो नागरिकांपर्यंत डिजिटल स्वरूपात मृद व जलसंधारणाचा संदेश पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. रील स्पर्धेत प्रत्येक जिल्ह्यात प्रथम पुरस्कार २५ हजार व गौरवचिन्ह, द्वितीय पुरस्कार १५ हजार व गौरवचिन्ह आणि तृतीय पुरस्कार १० हजार व गौरवचिन्ह प्रस्तावित आहे. पात्र सहभागींना ई-प्रमाणपत्र तसेच विजेत्यांना विशेष 'युवा मृद-जलदूत' म्हणून गौरविण्यात येणार आहे

एक Reel... मातीसाठी !, एक Reel... पाण्यासाठी !, एक Reel... सुरक्षित भविष्यासाठी ! हा रील्स प्रचारासाठी मुख्य संदेश आहे.

**जलसंधारण अभियान**

या स्पर्धेसोबतच १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या जलसंधारण अभियानादरम्यान राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यात शाळा व महाविद्यालयांमध्ये निबंध स्पर्धा (जलसंधारणाचे महत्त्व, पाण्याचे महत्व, जल है तो कल है, जलसंवर्धन उपाय, घरातील पाण्याचा वापर - Water Budget), चित्रकला / पोस्टर स्पर्धा- जलसंवर्धन उपाय, पाणी बचत उपाय, Rainwater Harvesting., वाद-विवाद स्पर्धाः (विषय- जलसंधारण शासनाची जबाबदारी कि जनतेची जबाबदारी, इतर विषय), एक शाळा- एक शोषखड्डा उपक्रम राबविणे, सर्व शाळांमध्ये पाणी बचतीचे महत्व विद्यार्थांना सांगणे., जलमित्र / जलदूत घोषित करणे, २१ ऑगस्ट रोजी शाळेत माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या फोटोस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करणे, २१ ऑगस्ट रोजी मृद व जलसंधारणाची शपथ घेणे, २१ ऑगस्ट रोजी प्रमाणपत्र / सन्मानचिन्ह / पुरस्कार वितरण करणे, २१ ऑगस्ट रोजी गावातील किंवा शहरातील जलतज्ञ/प्रतिष्ठीत व्यक्ती यांना प्रमुख पाहूणे म्हणून आमंत्रित करणे असे कार्यक्रम घेण्यात यावेत. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळा व महाविद्यालयांना आणि उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांना २६ जानेवारी रोजी पालकमंत्र्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

मृद व जलसंधारण विभागाचे पुढील सोशल मीडिया अकाऊंट आहेत.

Instagram - https://www.instagram.com/mahawalkathon2026/?hl=en
Facebook - https://www.facebook.com/mahawalkathon2026/
Twitter- https://x.com/MahaWalkathon26

**गजानन पाटील**
**विभागीय संपर्क अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.**

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



श्री महाकालेश्वराचे अलौकिक दर्शन!
श्रावण मासानिमित्त भक्ती शक्ती मंदिरात, उज्जैनच्या
श्री महाकालेश्वराचा प्रतिरूपाचे दर्शनाचा लाभ घ्यावा.
श्रावण मासारंभ निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !
|| ॐ नमः शिवाय || || श्री दत्तात्रेय नमः || || श्री विठ्ठल रुक्मिणी ||
भक्ती शक्ती मंदिर
डेरे फाउंडेशन कॅम्पस, कऱ्हे फाटा, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर

# संगमनेरमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठीचा मार्ग मोकळा

## एसटी महामंडळाकडून स्मारकासाठीची जागा नगरपालिकेकडे हस्तांतरित

### आमदार सत्यजीत तांबे यांच्या पाठपुराव्याला यश!



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर शहराच्या दृष्टीने आजचा दिवस ऐतिहासिक आणि आनंदाचा ठरला आहे. शहराच्या मध्यवर्ती बसस्थानक परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारण्याच्या अनेक वर्षांपासूनच्या प्रयत्नांना आता प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. आमदार सत्यजीत तांबे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे एसटी महामंडळ आणि संगमनेर नगरपालिका यांच्यात जागा हस्तांतरणाचा करार आज करण्यात आला असून, एसटी महामंडळाने स्मारकासाठी निश्चित केलेली जागा नगरपालिकेकडे हस्तांतरित केली आहे. यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे.

यावेळी नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे, राज्य परिवहन महामंडळ अहिल्यानगरचे श्री. राजेंद्र दामोधर जगताप, माजी नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे, उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख आणि मुख्याधिकारी दयानंद गोरे यांच्यासह नगरसेवक विश्वासराव मुर्तडक, किशोर टोकसे, शैलेश कलंत्री, किशोर पवार आदी उपस्थित होते.

या स्मारकासाठी २०१८ साली तत्कालीन नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे यांच्या कार्यकाळात संगमनेर नगरपालिकेने ठराव केला होता. त्यानंतर बसस्थानक परिसरात जागा मिळावी यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू होता. मात्र, एसटी महामंडळाच्या धोरणात्मक अडचणींमुळे जागा हस्तांतरित करण्यास विलंब झाला. दरम्यान, २०२३ साली आमदार सत्यजीत तांबे यांनी तत्कालीन मुख्यमंत्री व परिवहन मंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन संगमनेर बसस्थानक परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. त्यांच्या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत ६ मीटर बाय ४ मीटर जागा स्मारकासाठी देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच स्मारकाच्या परिसरात गार्डन आदी सुविधा विकसित करण्यासही परवानगी देण्यात आली.

आ. सत्यजीत तांबे म्हणाले, २०१८ पासून या स्मारकासाठी पाठपुरावा सुरू आहे. अतिरिक्त जागेचा प्रस्ताव एसटी महामंडळाच्या विचाराधीन असल्याने त्यासाठी आणखी किती काळ थांबायचे, हा प्रश्न होता. त्यामुळे उपलब्ध झालेल्या जागेत स्मारकाचे काम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. नगरपालिकेने यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण केली असून पुतळ्याची निविदा प्रक्रियाही अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे आज एसटी महामंडळ आणि नगरपालिकेतील करारामुळे या ऐतिहासिक कामाला प्रत्यक्ष सुरुवात होत आहे. स्मारकाच्या कामासाठी आवश्यक असलेली उपलब्ध जागा आता नगरपालिकेकडे आल्याने चौथरा, पुतळा आणि इतर प्राथमिक कामे सुरू करता येणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारक परिसराच्या विकासासाठी संगमनेर नगरपालिकेने एसटी महामंडळाकडे अतिरिक्त २२०० चौरस फूट जागेची मागणी केली आहे. या अतिरिक्त जागेचा प्रस्ताव सध्या एसटी महामंडळाच्या विचाराधीन आहे. या जागेत गार्डन व परिसराचा सर्वांगीण विकास करता यावा, यासाठी अतिरिक्त जागा मिळेपर्यंत आमदार सत्यजीत तांबे यांचा पाठपुरावा सुरूच राहणार आहे.

**छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकांसाठी ५० लाखांचा निधी**

**संगमनेर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकांच्या कामासाठी आमदार सत्यजीत तांबे यांच्या माध्यमातून ५० लाख रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. या दोन्ही महापुरुषांच्या स्मारकांचे काम दर्जेदार आणि भव्य स्वरूपात व्हावे, यासाठी आवश्यक सहकार्य करण्याची भूमिका आमदार तांबे यांनी जाहीर केली आहे.**

# दूध टँकरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले तालुक्यातील लिंगदेव येथील ठाकरवाडी परिसरात दुचाकी आणि दूध टँकरची जोरदार धडक होऊन भीषण अपघात झाला. सोमवारी (दि. १७) सकाळी घडलेल्या या अपघातात लहित बुद्रुक येथील पांडुरंग रखमा चौधरी (वय ५८) यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. पांडुरंग चौधरी हे त्यांच्या दुचाकीवरून जात असताना समोरून

दूध टँकरने त्यांना जोराची धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की चौधरी यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती. या दुर्दैवी घटनेमुळे लहित बुद्रुक गावावर शोककळा पसरली आहे. या प्रकरणी अकोले शहर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली या अपघाताचा पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, या अपघातामुळे लिंगदेव परिसरात काही काळ वाहतुकीची कोंडी झाली होती. नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले. अपघाताची नेमकी कारणे आणि दूध टँकरचालकाची भूमिका याबाबत पोलिसांकडून तपास सुरू असून, या घटनेनंतर परिसरातील नागरिकांकडून वाहनचालकांनी वेगावर नियंत्रण ठेवून काळजीपूर्वक वाहन चालविण्याची मागणी होत आहे.

# ७० वर्षीय महिलेवर हल्ला करून सोन्याचे डोरले लंपास

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- तालुक्यातील पठार भागातील वरची माहूली (बांबळेवाडी) परिसरात घरात घुसून ७० वर्षीय महिलेवर चाकूने प्राणघातक हल्ला करत तिच्या गळ्यातील सुमारे ३० हजार रुपये किमतीचे सोन्याचे डोरले हिसकावून नेल्याची घटना रविवारी (दि. १६ ऑगस्ट) सकाळी घडली. याप्रकरणी कैलास दत्तू गाडेकर यांनी घारगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

फिर्यादीत नमूद केल्यानुसार, ७० वर्षीय सिंधुबाई संतू गाडेकर या रविवारी सकाळी घरात एकट्या असताना एक अनोळखी व्यक्ती पिण्यासाठी पाणी मागण्याच्या बहाण्याने घरात आला. पाणी देण्यासाठी त्या आत गेल्यानंतर संबंधित व्यक्तीने पाठीमागून घराचा दरवाजा बंद करून कडी लावून घेतली. त्यानंतर त्याने सिंधुबाईंच्या गळ्यातील सोन्याचे डोरले हिसकावण्याचा प्रयत्न केला. सिंधुबाईंनी त्यास विरोध दर्शवला असता, संशयिताने चाकूने त्यांच्या डोक्यावर, कपाळावर, तोंडावर, गालावर आणि डोळ्याजवळ वार करून त्यांना गंभीर जखमी केले. या हल्ल्यानंतर संबंधित व्यक्ती सोन्याचे डोरले घेऊन पसार झाला.

घटनेनंतर जखमी सिंधुबाई यांना उपचारासाठी तातडीने प्रथम घारगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी संगमनेर येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. या हिंसक घटनेमुळे प्र परिसरात घबराट व खळबळ उडाली असून, घारगांव पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382




सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
※ कर्ज रक्कम वाढ । ※ कर्ज व्याजदर कमी । ※ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या
स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
- सर्जरी विभाग
- डायलिसीस विभाग
- हृदयरोग विभाग
- जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- मेडिसीन विभाग
- स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग
- न्यूरोविभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25